आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या संपूर्ण माहितीची पाहणी त्यांच्या कार्यालयात देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ती केली असून त्यांचे समाधान झाले आहे व याबाबतची पोच त्यांनी दिनांक २४-१०-२०११ रोजी तहसीलदार (संगायो), नांदेड यांना दिली आहे.

आयोगापुढील कागदपत्रावरुन ही बाब दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अफसर शेख बाबु, रा. हमालपुरा मस्जीदजवळ, नांदेड - ०२.

२. जन माहिती अधिकारी तथा उपलेखापाल, संगायो शहर विभाग, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, संगायो शहर विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहंमद अन्वरउल्ला खान,<br>९-४-४५५, कय्यूम प्लॉट्स, नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, स्नेहनगर, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, स्नेहनगर, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, स्नेहनगर, नांदेड - श्री. सबनीस बी. मा. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, स्नेहनगर, नांदेड - श्री. खाजा मसीओद्दीन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २९-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये नांदेड - मालेगाव रोड चेन कि. मी. १४/२०० च्या धारणेसंदर्भात दोन मुद्दयावर माहिती मागितली आहे. सदरची माहिती विहित मुदतीत अपिलार्थीस दिनांक २९-१०-२००९ रोजी रुपये दहा इतक्या शुल्काचा भरणा करावा असे अपिलार्थीस कळविल्यानंतर अपिलार्थीने दिनांक २६-१०-२००९ रोजी रुपये दहा इतक्या शुल्काचा भरणा केल्यानंतर दिनांक २७ ऑक्टोबर २००९ रोजी देण्यात आली. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील त्यांना चुकीची माहिती दिली असे नमूद करुन सादर केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, नांदेड यांनी सुनावणी घेऊन दिनांक १४-१२-२००९ रोजी निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिली आहे त्यामुळे अपील निकाली काढण्यायोग्य आहे. अपिलार्थी प्रथम अपील सुनावणीस उपस्थित होते.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद, उपलब्ध कागदपत्र, अपिलार्थीचे व्दितीय अपील व त्यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप इत्यादी विचारात घेता अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे असे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहंमद अन्वरउल्ला खान, ९-४-४५५, कय्यूम प्लॉट्स, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, स्नेहनगर,

नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, स्नेहनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजकुमार विठ्ठलराव वाघमारे, : अपिलार्थी
भावस्वार चौक, तथागत नगर, पंचशिल ध्वजाच्या समोर,
नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड
जन अपिलीय अधिकारी, :
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड - श्री. एस. व्ही. पार्डीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड - श्री. व्ही. सी. नवले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीच्या अर्जान्वये दोन मुद्दयावर हजेरी सहायकांच्या जेष्ठतासूची बाबत माहिती मागितली आहे. याकरिता रुपये २८ इतक्या शुल्काचा भरणा करण्याचे अपिलार्थीस विहित मुदतीत दिनांक २१-१२-२००९ रोजी कळविण्यात आले. त्यानुसार अपिलार्थी यांनी दिनांक ०४-०१-२०१० रोजी शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस १४ पृष्ठांची माहिती दिनांक १३-०१-२०१० ला देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदरची माहिती व्यक्तिशः घेऊन त्याची पोच दिलेली आहे. दिलेली पोच त्यांच्या दप्तरी दाखल आहे. मुद्दा क्रमांक दोन बाबत अपूर्ण माहिती मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर निर्णय घेताना जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली मुद्दा क्रमांक २ ची उर्वरीत माहिती - कव्हरिंग पत्राची प्रत देण्याचे सूचित केले. सदरच्या कव्हरिंग पत्राची प्रत कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नसल्याचे आढळून आले व त्यानुसार अपिलार्थीस दिनांक २०-०४-२०१० रोजी कळविण्यात आले. त्याची नोंदही अपिलार्थीने घेतली आहे.

अपिलार्थी यांचे व्दितीय अपील दिनांक १६-०३-२०१० रोजीचे आहे व अपिलार्थीची पोच दिनांक २०-०४-२०१० रोजीची आहे. यावरुन अपिलार्थीस उपलब्ध सर्व माहिती देण्यात आली आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजकुमार विठ्ठलराव वाघमारे, भावस्वार चौक, तथागत नगर, पंचशिल ध्वजाच्या

समोर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. किशोरकुमार धरमचंद ओहरी, | : | अपिलार्थी |
| | व्दारा, गणेशसिंह बिसेन, बालाजी मंदिर, गाडीपुरा, नांदेड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | उप विभागीय पोलीस अधिकारी, इतवारा, नांदेड | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस अधीक्षक, इतवारा उप विभाग, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. शा. म. तारे,<br>पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, इतवारा, नांदेड | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २५-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जाव्दारे श्री गुरुगोविंदसिंघजी तंत्रशास्त्र महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड येथील शांतीधरम कँटीन दिनांक २१-०४-२००५ रोजी जाळल्यासंदर्भात त्यांनी दिलेल्या तक्रारीवर विभागाने केलेली चौकशी, एफ. आय. आर., जवाब, पंचनामा इत्यादी मुद्दयांवर माहिती मागितली आहे. माहिती संबंधाने पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, नांदेड (ग्रा.) यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी दिनांक २१-०४-२००५ रोजी घडलेल्या घटनेसंबंधाने पोलीस स्टेशन मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता, सदर घटनेसंबंधात अभिलेखावर नोंद मिळून आली नाही असे लेखी कळविल्याने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-११-२००९ च्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्याप्रमाणे कळविले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर देखील प्रथम अपिलीय अधिका-याने अपिलार्थीस त्यांनी दिलेला अर्ज पोलीस ठाणे अभिलेखावर उपलब्ध नाही, करिता माहिती देणे शक्य झाले नाही असे दिनांक ०२-०१-२०१० रोजी कळविले आहे व प्रथम अपील निकाली काढले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. त्यामुळे आयोगाच्या स्तरावर हे प्रकरण बंद करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशोरकुमार धरमचंद ओहरी, व्दारा, गणेशसिंह बिसेन, बालाजी मंदिर, गाडीपुरा, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस अधीक्षक, इतवारा उप विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,

नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनोहर गुंडेराव वाघमारे, : अपिलार्थी

मु. सुगाव (खु.), पो. सुगाव (कॅम्प), तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुगाव खु.,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड,
जिल्हा नांदेड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२७४

२ सुनावणीची तारीख दि. ०१-१२-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित

ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुगाव खु.,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड,
जिल्हा नांदेड

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०५-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे स्वत: अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०५-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत सुगांव (खु.) येथील प्लॉट नं. २१६ मधील मालक मनोहर गुंडेराव वाघमारे यांचे नावे न. नं. ८ उता-याला क्षेत्र उ. द. ९० व पु. प. ५३ अशी नोंद असताना हीच नोंद आपल्या हस्ते खाडाखोड करुन प्लॉट नं. २१६ मधील जागा श्रीरंग माधव नुरुंदे यांचे नावे कोणत्या कारणास्तव व पुराव्याआधारे नं. नं. ८ उता-याला नोंद घेण्यात आली, प्लॉट नं. २१६ मधील मालक मनोहर गुंडेराव वाघमारे यांना सुनावणी नोटीस न देता माझ्या नावावरील जागा श्रीरंग माधव नुरुंदे यांचे नावे कोणत्या पुराव्याआधारे नावे नोंद करण्यात आली, अशी माहिती मागितली आहे. सदरची माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थीस दहा दिवसात माहिती द्यावी असा दिनांक २३-०२-२०१० रोजी निर्णय दिलेला आहे. तथापि अद्यापपावेतो माहिती दिली आहे किंवा कसे याचा बोध होत नाही. याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी या प्रकरणात संपूर्ण चौकशी करणे आवश्यक ठरत आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी आयोगाकडील सुनावणीस अनुपस्थित आहेत याबाबत खुलासा मागवून घेऊन चौकशी करण्यात यावी. त्याचप्रमाणे आतापर्यंत माहिती दिली गेली नसल्यास ती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, जिल्हा नांदेड अपिलार्थीस पाठवतील याची व्यवस्था करावी व आतापर्यंत माहिती दिली नसल्यास या विलंबासाठी कोण जबाबदार आहे याची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) प्रमाणे करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

२. या प्रकरणात आतापर्यंत अपिलार्थीस माहिती दिली नसल्यास या विलंबासाठी कोण जबाबदार आहे याची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्याची

शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) प्रमाणे करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनोहर गुंडेराव वाघमारे, मु. सुगाव (खु.), पो. सुगाव (कॅम्प), तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुगाव (खु.), तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, जिल्हा नांदेड यांना माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष, | : | अपिलार्थी |
| महाराष्ट्र राज्य शै. कलाशिक्षक संघ, जिल्हा शाखा, नांदेड, व्दारा, नरसिंह विद्यामंदिर, महावीर सोसायटी, नांदेड | | |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. निलेवाड लोकेश, श्री. संजय बाउस्कर, श्री. सुर्यवंशी अनिल व श्री. कसबे व्ही. सी. | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड - श्री. राम पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक, नांदेड विभाग, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-१०-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी तसेच इतर पदाधिकारी हे जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत असल्यामुळे त्यांचेच आहेत. त्यांच्याशी त्यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भातील पाच मुद्दयावर चर्चा केली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १, २, ४ व ५ संदर्भातील कागदपत्रे, परिपत्रक इत्यादी आज रोजी देण्यात आले. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली.

अपिलार्थी यांना आज रोजी माहिती मिळाली असल्याकारणाने त्यांनी माहितीची पाहणी करावी व अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

मुद्दा क्रमांक ३ बाबत अपिलार्थी यांनी युक्तिवादात आयोगास अवगत केले की, बालचित्रस्पर्धेकरिता नांदेड विभागाकडून चित्रकला प्रस्ताव छाननी करुन कला संचालनालय, मुंबई येथे पाठविण्यात येतात. त्यांच्याकडे २००५ ते २००९ या कालावधीतील असे किती प्रस्ताव पाठविले त्याबाबतची माहिती मागितली आहे व ती त्यांना देण्यात आलेली नाही. सदरची माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याकारणाने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस संबंधित नस्तीची संपूर्ण पाहणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. तसेच जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसेल तर त्या माहितीकरिता ज्या कार्यालयात ही माहिती उपलब्ध होऊ शकते त्या कार्यालयाकडे अपिलार्थींनी अर्ज करावा असेही त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांना नुकत्याच प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या मुद्दा क्रमांक ३ बाबतची माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्‍चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनिल सुर्यवंशी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शै. कलाशिक्षक संघ, जिल्हा शाखा, नांदेड, व्दारा, नरसिंह विद्यामंदिर, महावीर सोसायटी, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मुदखेडकर महमद एकबाल महमद युसूफ,<br>मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, रा. मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकर, जिल्हा नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकर, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. सय्यद कासीम हाजी सय्यद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३०-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष सर्वजण अनुपस्थित आहेत. श्री. आर. एन. तावडे, अधीक्षक, पंचायत समिती, भोकर उपस्थित आहेत.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकर यांचे प्रतिनिधी यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकर यांचे दिनांक २९-११-२०११ चे पत्र आयोगास सादर केले. या पत्रामध्ये त्यांनी आयोगास विनंती केली आहे की, सदर सुनावणीस पुढील तारीख देण्यात यावी. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनाही त्यांची बाजू मांडण्याची एक संधी देण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महमद एकबाल महमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, रा. मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, भोकर,

जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख अनवर शेख मन्नु,<br>घर नंबर ४९, ब्लॉक नंबर ४, लेबर कॉलनी, नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून, तहसील कार्यालय, नांदेड<br>- श्री. आर. एम. येजगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड<br>- डॉ. अरविंद नरसीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २९-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये सार्वजनिक धान्य वितरण व्यवस्थेबाबत विविध मुद्दयावर विस्तृत माहिती मागितली आहे. सदरच्या माहितीची व्याप्ती विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-११-२००९ च्या पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कार्यालयात समक्ष उपस्थित राहून माहिती हस्तगत करावी असे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थी यांनी दिनांक १९-१२-२००९ रोजी माहितीची पाहणी केली व याबाबतची पोच त्यांनी दिनांक १९-१२-२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना दिली आहे. उपलब्ध कागदपत्रावरुन आयोगास या बाबी दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अनवर शेख मन्नु, घर नंबर ४९, ब्लॉक नंबर ४, लेबर कॉलनी, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. स. नूर अली स. बाखर अली, : अपिलार्थी
रा. कुबा कॉलनी, अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून, तहसील कार्यालय, नांदेड<br>- श्री. आर. एम. येजगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड<br>- डॉ. अरविंद नरसीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १७-०८-२००९ च्या माहिती अर्जान्वये तुप्पा शिवारातील जप्त केलेल्या लोखंडी टाक्याची विल्हेवाट लावण्याबाबत जिल्हा पुरवठा यांच्या कार्यालयाच्या पत्राचा संदर्भ देऊन त्या पत्राची झेरॉक्स व कार्यवाहीचा अहवाल मागितला आहे. माहितीचा कालावधी सन २००६ ते २००९ असा आहे.

अपिलार्थी यांनी नमूद केलेल्या पत्राचा शोध घेऊनही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संदर्भ प्राप्त होऊ शकला नाही. याकरिता अपिलार्थीस दिनांक १५-०१-२०१० रोजी त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात काही संदर्भ दिल्यास माहिती देणे सुलभ होईल असे कळविले आहे. सदरचे पत्र अपिलार्थीस मिळाले आहे. त्यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. नेमके माहितीचा संदर्भ न पुरविल्यामुळे माहिती देता येऊ शकली नाही अशी जन माहिती अधिकारी यांनी त्यांची बाजू मांडली. अपिलार्थीने प्रतिसाद दिलेला नाही, या बाबी विचारात घेता प्रकरण या टप्प्यावर बंद करण्यात यावे असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स. नूर अली स. बाखर अली, रा. कुबा कॉलनी, अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्रीमती रहिमउन्नीसा बेगम अ. रशिद,<br>रा. मिल्लत नगर, नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, मदिनातुल उलूम प्राथमिक शाळा,<br>लालाबाडा, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक मदिनातुल उलूम प्राथमिक शाळा मुलांचे,<br>लालाबाडा, नांदेड - श्री. म. अकबर म. नवाज | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड<br>- श्री. मडावी ई डब्ल्यू. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ३०-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये त्यांच्या शाळेत कार्यरत असलेल्या तीन शिक्षकांच्याबाबत वैयक्तीक तसेच कामकाजाबद्दलची विस्तृत माहिती २२ मुद्दयावर मागितली आहे. सदरची माहिती एकत्रित करुन अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती प्राप्त झाल्याची दिनांक ०२-०२-२०१० ची पोच दिली आहे.

आयोगापुढील कागदपत्रावरुन वरील बाबी दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**कॅम्प : नांदेड**
**दिनांक ०२-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती रहिमउन्नीसा बेगम अ. रशिद, रा. मिल्लत नगर, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक मदिनातुल उलूम प्राथमिक शाळा, लालाबाडा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गव्हाणे विनायक मारोतराव, : अपिलार्थी
मु. पो. आनंदसदन, रामनगर, किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट,
जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
किनवट, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२४१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट, जिल्हा नांदेड - श्री. एस. आर. जगदाळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट, जिल्हा नांदेड - श्री. एस. के. पवार | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सन २००७ ते २००९ या वर्षात आदिवासी लोकांना वाटप केलेल्या योजनांच्या तपशिलाबाबत माहिती मागितली होती. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. अपिलार्थी दारिद्र्यरेषेखालील नाहीत. माहितीकरिता रुपये दोन याप्रमाणे प्रत्यक्षात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे दिनांक ०३-११-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते म्हणून त्यांना पुन्हा दिनांक ०२-१२-२००९ च्या पत्रान्वये स्मरणपत्र दिले. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी आदिवासी लाभार्थ्यांच्या योजनेबाबत माहिती मागितली आहे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना शुल्काचा संपूर्ण तपशील कळविला नाही. तो कळविणे आवश्यक होते म्हणजे शुल्काचा भरणा करणे शक्य झाले असते.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना एकूण पृष्ठ संख्या व शुल्क कळविल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी आदिवासी लाभार्थ्यांच्या योजनेची माहिती मागितली आहे. या सर्व बाबी विचारात घेता तसेच अपिलार्थी जरी व्यक्तिशः माहिती घेणार होते तरी विशेष बाब म्हणून नोंदणीकृत टपालाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली १०५ पृष्ठे अपिलार्थीस विनामूल्य पाठवावीत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**कॅम्प : नांदेड**

**दिनांक ०२-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गव्हाणे विनायक मारोतराव, मु. पो. आनंदसदन, रामनगर, किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रमेश दौलतराव माने, : अपिलार्थी
अध्यक्ष, नांदेड जिल्हा लघुवृत्तपत्र संपादक व पत्रकार संघ,
सोमेश कॉलनी, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), वनपरिक्षेत्र अधिकारी
कार्यालय, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक वनसंरक्षक (तेंदू), नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२४२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रमेश दौलतराव माने | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, नांदेड - श्री. डी. एन. शेकरवार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदू), नांदेड - श्री. बी. एस. घवले | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०२-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी सन २००० ते २००६ पर्यंतची नांदेड परिक्षेत्रातील नांदेड वन क्षेत्रातील सर्व गावातील व इतर तालुक्यातील रोजगार हमी योजने अंतर्गत विस्तृत अशी माहिती मागितली आहे. त्याचप्रमाणे इतर मुद्दयाबाबत विस्तृत माहिती मागितली आहे. अशी विस्तृत माहिती मागितली असता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्याची पाहणी देणे योग्य ठरते. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदू), नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २६-११-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय देताना ही बाब विचारात घेणे आवश्यक होते. असे केले असते तर अपिलार्थीस आतापर्यंत माहितीची पाहणी मिळाली असती. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिका-याने अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी दोन दिवस निश्चित करुन उपलब्ध करुन देण्यात यावीत ही बाब नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस कळवावी. ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी मान्य केली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदू), नांदेड यांना सदर पाहणी एका महिन्यात पूर्ण होईल याची व्यवस्था करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी दोन दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**कॅम्प : नांदेड**
**दिनांक ०२-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेश दौलतराव माने, अध्यक्ष नांदेड जिल्हा लघुवृत्तपत्र संपादक व पत्रकार संघ, सोमेश कॉलनी, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदू), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक मारोती बच्चेवार, : अपिलार्थी
रा. तगलाईन, मेन रोड, मुखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२४३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड - श्रीमती अनुराधा दि. ढालकरी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २६-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १४-१२-२००९ च्या माहिती अर्जान्वये राज्य माहिती आयोग औरंगाबाद यांनी व्दितीय अपील क्रमांक ४७६/०८ मध्ये दिनांक ०४-०६-२००९ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितली आहे. राज्य माहिती आयोगाच्या या आदेशातील मुद्दा क्रमांक २ ची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. सदरची कार्यवाही तहसीलदार, मुखेड यांच्या कार्यक्षेत्रातील आहे. अपिलार्थी यांनी मुद्दा क्रमांक ३ बाबत काय कारवाई केली अशा माहितीची मागणी केली आहे. याबाबत अपिलार्थीस दिनांक २७-०२-२०१० रोजीची परिस्थिती कळविली आहे. आज रोजी सुनावणीत त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, आयोगाने निर्देशित केल्यानुसार संबंधित नायब तहसीलदार, मुखेड यांच्याविरुध्द शिस्तभंग दोषारोपपत्र दिनांक २२-०३-२०१० रोजी तामील करण्यात आले आहेत. अशा प्रकारे शिस्तभंग प्रक्रिया सुरु झाली आहे.

वरील सद्यस्थिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने कळविण्यात यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे सध्याची वस्तुस्थिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य कळवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक मारोती बच्चेवार, रा. तगलाईन, मेन रोड, मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष कोंडिबाराव तवर, : अपिलार्थी
रा. इतवारा, लाड गल्ली, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक, भूमि अभिलेख, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संतोष कोंडिबाराव तवर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, भूमि अभिलेख, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत याची गंभीर दखल आयोगाने घेतली आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अनुपस्थितीबाबतचा खुलासा उप संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही. तसेच अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, नांदेड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष कोंडिबाराव तवर, रा. इतवारा, लाड गल्ली, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उप संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अशोक पांडुरंग बोईनवाड,<br>मनोहर टॉकीज गल्ली, मुखेड, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, गटसाधन केंद्र, मुखेड, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, गटसाधन केंद्र, मुखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. व्यवहारे एस. बी. (शि. वि. अ.) | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड<br>- श्री. मडावी ई. डब्ल्यू. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक पांडुरंग बोईनवाड, मनोहर टॉकीज गल्ली, मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, गटसाधन केंद्र, मुखेड, जिल्हा नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुरेश इरबाजी तेलंगे, | : | अपिलार्थी |
| | एन. डी. ११९/१२/१,हडको, नवीन नांदेड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | अव्वल कारकून, कार्यालय उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड - श्री. सी. एम. सामलेटी | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही. सुनावणी घेऊन निर्णय पारीत करणे आवश्यक ठरत आहे.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**नांदेड : कॅम्प** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश इरबाजी तेलंगे, एन. डी. ११९/१२/१,हडको, नवीन नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, कार्यालय उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी

व्दारा, मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

मुख्याध्यापक, सुधाकर नाईक प्राथमिक शाळा, वसरणी, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, सुधाकर नाईक प्राथमिक शाळा, वसरणी, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड<br>- श्री. ई. डब्ल्यू. मडावी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २८-०४-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. एस. पी. नैण, व्दारा, मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सुधाकर नाईक प्राथमिक शाळा, वसरणी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोतीराम गयबू काळे, : अपिलार्थी
रा. जानापुरी, पो. वडेपुरी S.R.T. तालुका लोहा,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एम. ए. सोलापुरे, लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड<br>- श्री. अजय गुल्हाने | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १३-०५-२००९ च्या माहिती अर्जान्वये नांदेड जिल्ह्यात किती तलाठ्यांना लॅपटॉप वाटप केले आहे व त्यावर ७/१२ वाटप करण्यासाठी किती काम करण्यात आले आहे इत्यादीबाबत तसेच तलाठ्याच्या कार्यालयात लावलेला बोर्ड इत्यादीचा तपशील याबाबतची दहा मुद्दयावर माहिती मागितली आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये एकाही तलाठ्यास लॅपटॉप पुरविण्यात आलेला नाही, त्यामुळे यासंदर्भातील माहिती निरंक ठरत आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये ४०० तलाठी आहेत त्यानुसार माहिती एकत्रित करुन अपिलार्थीस देणे अपिलार्थीस अभिप्रेत दिसत आहे. अशी माहिती देण्यासाठी कालावधी लागला. उपलब्ध झालेली माहिती अर्जदारास देण्यात येत आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी विचारलेल्या माहितीबाबत जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे ती माहिती अपिलार्थीस देण्यात यावी, त्याचप्रमाणे ज्या तालुक्यातील माहिती उपलब्ध आहे ती अपिलार्थीस देण्यात यावी. प्रत्येक तलाठी हा जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात आला आहे त्यामुळे अपिलार्थी यांनी ज्या सज्याच्या कामकाजासंदर्भात किंवा तलाठ्याच्या संदर्भात माहिती त्यांच्याकडे मागणी केली आहे, जन माहिती अधिकारी यांनी अशा माहितीच्या अर्जावर कलम ६ (३) खाली संबंधित माहितीचा अर्ज पाच दिवसाच्या आत, एक किंवा दोन दुसरे माहिती अधिकारी असतील त्यांच्याकडे वर्ग करणे आवश्यक आहे. जास्त माहिती अधिकारी असतील तर विहित मुदतीत अर्जदारास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे परस्पर अर्ज सादर करण्यास कळविणे जरुरी आहे. अतः जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध असलेली माहिती नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**कॅम्प : नांदेड**
**दिनांक ०२-१२-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबू काळे, रा. जानापुरी, पो. वडेपुरी S.R.T. तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मो. आसीफ मो. ईब्राहीम,<br>रा. गणेश मंदिर समोर, एस. पी. ऑफिसच्या मागे,<br>वजिराबाद, नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय,<br>नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस अधीक्षक, पोलीस उप अधीक्षक मुख्यालय,<br>नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. शा. म. तारे,<br>पोलीस स्टेशन ईतवारा | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११-०९-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २८-०९-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये खालील तीन मुद्दयावर माहिती मागितल्याचे दिसून येत आहे.

१. पोलीस मुख्यालय येथील मस्जीदच्या प्रकरणात उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र. ६५३२/०८ कोण दाखल केले त्याची प्रत.

२. त्या संबंधाने उच्च न्यायालयात पोलीस अधीक्षक यांनी उत्तर किंवा शपथपत्र सादर केले असेल त्याची प्रत.

३. वरील दोन्ही प्रती शासनास पाठविले असल्यास त्या पत्रकाची प्रत.

सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन प्रलंबीत असल्याने तसेच सदर पिटीशन त्रयस्थ व्यक्तिने सादर केले असल्यामुळे सदरची माहिती जन माहिती अधिका-यातर्फे कलम ८ (१) (त्र) नुसार देण्यात येत नाही असे दिनांक २९-०८-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाशी सहमती दर्शविली व अपील निकाली काढले आहे. अपिलार्थी प्रथम अपील सुनावणीस अनुपस्थित होते असे दिसून येते. आजही त्यांना संधी देण्यात आली होती तथापि ते आजही अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपिलावरील निर्णय इत्यादी बाबी विचारात घेता अपिलार्थीने मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (ख) (छ) नुसार अपिलार्थीस देय होणार नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**कॅम्प : नांदेड**
**दिनांक ०२-१२-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मो. आसीफ मो. ईब्राहीम, रा. गणेश मंदिर समोर, एस. पी. ऑफिसच्या मागे, वजिराबाद, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस अधीक्षक, पोलीस उप अधीक्षक मुख्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, : अपिलार्थी
रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३८३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून, आस्था-२, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड - श्री. डी. डी. धोंगडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड - श्री. अजय गुल्हाणे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १०-०६-२००९ च्या माहिती अर्जान्वये जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या कार्यक्षेत्रात येणा-या क्षेत्रातील अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या जेष्ठता यादीची सत्यप्रत अ, ब, क व ड श्रेणी, त्याचप्रमाणे नियुक्तीसाठी देण्यात आलेल्या शिफारस पत्राची सत्यप्रत इत्यादीची विस्तृत माहिती सन ०१ जानेवारी २००५ ते १० जून २००९ या कालावधीतील मागितली आहे. माहिती संकलीत करुन अपिलार्थीस २८३ पृष्ठे दिनांक २४-०९-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविली आहे. त्यामध्ये वर्ग-३ पाने १४४, वर्ग-४ पाने १३० व शिफारसपत्र पाने ०९ याचा समावेश आहे. सदरची माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे या पत्रानुसार काही अतिरिक्त माहिती हवी असल्यास अपिलार्थीने या शाखेशी संपर्क साधावा असेही कळविले आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत.

अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना अर्धवट माहिती मिळाली असे मोघमपणे नमूद केले आहे, नेमके नमूद केलेले नाही. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, रा. घर नं. ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, आस्था-२, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पुपलवाड भागवत आत्माराम, : अपिलार्थी
मु. पो. पाटोदा (त. ब.), तालुका नायगांव खै., जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पुपलवाड भागवत आत्माराम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड - श्री. एस. बी. पोटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड - श्री. गजानन शिंदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी मागितलेल्या दोन मुद्दयावरील माहितीपैकी मुद्दा एक ची माहिती त्यांना मिळालेली आहे, तथापि दिनांक ०३-०१-२००८ रोजी त्यांनी केलेल्या तक्रारी अर्जावर चौकशीच्या अहवालाची प्रत त्यांना तहसीलदार, नायगांव यांच्याकडून प्राप्त झाली नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगांव (खै.) यांनी आयोगास अवगत केले की, अभिलेख तपासून अपिलार्थीस कळविण्यात येईल.

वरील बाबी विचारात घेता मुद्दा क्रमांक दोन बाबत तहसीलदार, नायगांव (खै.) यांनी अपिलार्थीस पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने, चौकशी झाली असल्यास अहवालाची झेरॉक्स प्रत विनामूल्य पाठविण्याची व चौकशी झाली नसल्यास तसे कळविण्याची व्यवस्था करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**कॅम्प : नांदेड**
**दिनांक ०२-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पुपलवाड भागवत आत्माराम, मु. पो. पाटोदा (त. ब.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, नायगांव खै., जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी

मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

तहसील कार्यालय, देगलूर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३८५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, देगलूर, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २४-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, जिल्हा नांदेड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| सौ. सुरेखा चंपतराव पाटील,<br>रा. संभाजीनगर, तरोडा (बु.), नांदेड - ०५ | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून, तहसील कार्यालय, नांदेड<br>- श्री. आर. एम. येजगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी नांदेड तालुक्यातील तीन अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांची सन २००२ ते २००८ अशी सहा वर्षाची विविध मुद्दयावर विस्तृत माहिती मागितली आहे. सदरची माहिती तीन त्रयस्थांकडून प्राप्त करुन घेण्यासाठी काही कालावधी लागला. सर्व माहिती संकलीत केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक १०-१२-२००९ रोजी देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड यांना पत्राव्दारे पोच देऊन कळविले आहे की, दिनांक ३०-११-२००९ रोजी राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे अपील दाखल केले आहे त्यानंतर दिनांक १०-१२-२००९ रोजी माहिती प्राप्त झाली आहे व सदरच्या माहितीचा अर्ज निकाली काढण्यात यावा.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन ही बाब दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**कॅम्प : नांदेड**

**दिनांक ०२-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. सुरेखा चंपतराव पाटील, रा. संभाजीनगर, तरोडा (बु.), नांदेड - ०५.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. टेकाळे शेषेराव एकनाथ,<br>रा. पो. कुपटी (मा.), तालुका माहूर, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे - प्रतिनिधी - श्री. एस. डी. तोटवाड, अव्वल कारकून | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड<br>- श्री. कांबळे ए. एस. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी नुकताच कार्यभार स्विकारला आहे. अपिलार्थी यांनी त्यांचा माहितीचा दिनांक ०७-०७-२००९ चा अर्ज तहसीलदार, तहसील कार्यालय, माहूर यांच्याकडे पाठविला होता. त्यावर दिनांक २१-०७-२००९ रोजी तहसीलदार, माहुर यांनी रेकॉर्ड तहसील कार्यालय, किनवट येथे उपलब्ध असल्याचे कळविल्याने अपिलार्थीने दिनांक ३१-०७-२००९ रोजी तहसीलदार, किनवट यांच्याकडे माहितीचा अर्ज केलेला आहे. या माहितीच्या संदर्भात अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेले नाही त्यामुळे सुनावणी घेता आली नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांच्याकडे प्रकरण अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. टेकाळे शेषेराव एकनाथ, रा. पो. कुपटी (मा.), तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. स. वजीर स. अहमद, : अपिलार्थी
रा. बरकतपुरा, अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर,
जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३८८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड<br>- श्री. राजु मुत्तेवार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड<br>- श्री. संतोष वेणीकर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २१-०३-२००९ च्या माहिती अर्जान्वये विविध कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या अर्धापूर तालुक्यातील पॅरोलवर, संचित रजेवर व इतर रजेवर सुट्टीवर आलेल्या कैद्यांची काही मुद्दयावर माहिती मागितली आहे. या माहितीसंदर्भात त्यांच्या कार्यालयाने पॅरोलवर असलेल्या कैद्यांची माहिती रुपये २४ इतक्या शुल्काचा भरणा करावा म्हणजे माहिती देण्यात येईल, असे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार अपिलार्थीस विहित मुदतीत दिनांक ३१-०३-२००९ रोजी कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यास प्रतिसाद दिलेला नाही, ही बाब विचारात घेता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**कॅम्प : नांदेड** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स. वजीर स. अहमद, रा. बरकतपुरा, अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा,<br>रहेमान मंजिल, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी मस्जीद समोर, देगलूर रोड, नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२३८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली - श्री. एस. आर. बिरादार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली - श्री. ए. टी. धोंडगे | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी सध्या उप अभियंता, सा. बा. उपविभाग, हिंगोली - श्री. नाईकवाडे पी. जी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०४-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९-०६-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०७-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी (सध्याचे) यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये सन २००७ ते २००८ या कालावधीतील सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली अंतर्गत असलेल्या लहान व मोठ्या मोजमाप पुस्तिकांच्या तपशीलाबाबतची माहिती मागितली आहे. सदरची माहिती अपिलार्थी व्यक्तिशः घेणार होते. अपिलार्थी दारिद्र्य-रेषेखालील नाहीत असे त्यांनी माहिती अर्जात नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध करुन ठेवण्यात आली आहे (एकूण पृष्ठे ४०). अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते, त्यानुसार त्यांनी दिनांक १६-०६-२००९ रोजी कार्यालयात उपस्थित राहून माहिती हस्तगत केली आहे व तशी पोच दिली आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन ही बाब दिसून येत आहे. तसेच अपिलार्थी यांच्या दिनांक ०१-०७-२००९ च्या व्दितीय अपिलामध्ये, दुसरे अपील करण्याचे प्रयोजन मध्ये माहिती ८२ दिवसाच्या उशिराने दिल्यामुळे असे फक्त एवढेच नमूद केले आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते, म्हणून त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन उपलब्ध असलेली माहिती विहित मुदतीत घेणे अभिप्रेत होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १६-०६-२००९ रोजी निर्णय घेताना सदरची बाब विचारात घेतल्याचे दिसून येत नाही. शास्तीचे अधिकार, माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये आयोगास देण्यात आलेले आहेत, प्रथम अपिलीय अधिकारी यांना नाहीत याची नोंद प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेणे आवश्यक आहे. या सर्व बाबी विचारात घेता या प्रकरणात कलम २० (१) वापरण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**कॅम्प : नांदेड**
**दिनांक ०२-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजिल, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी मस्जीद समोर, देगलूर रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लक्ष्मणराव भिकाजी आव्हाड, : अपिलार्थी
रा.रांजणगाव शेणपुंजी, ता.गंगापूर,
जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय,मनूर,
ता.वैजापूर,जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, वैजापूर, जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत मनूर,ता.वैजापूर,जि.औरंगाबाद कार्यालयाशी संबंधित विविध कामासंदर्भात एकूण १८ मुद्यांवर विस्तृत अशी विविध माहिती मागितली आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही, असे वेळोवेळी निर्णय घेण्यात आलेले आहेत.

त्यामुळे माहितीची व्याप्ती कमी करणे आवश्यक ठरत आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी निश्चित १-२ कामांबाबत किंवा १-२ मुद्यांबाबत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे पंधरा दिवसांच्या आत मागावी. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यासंदर्भात मूळ अर्ज विचारात घेऊन माहिती द्यावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती कमी करुन नेमके २-३ कामांचे मुद्दे त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मणराव भिकाजी आव्हाड, रांजणगाव (शेणपुंजी) पो. घाणेगाव, ता.गंगापुर,

जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,मनूर, ता.वैजापूर, जि.औरंगाबाद  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, वैजापूर, जि.औरंगाबाद  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बिपीनचंद्र केशवराव पाटील, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,
शहर विभाग १, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,
शहर विभाग १, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२७७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.०९.२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बिपीनचंद्र केशवराव पाटील , रा. एन-११, एच-सेक्टर, प्लॉट नं.०५,नवजीवन कॉलनी,हडको, औरंगाबाद- ४३१ ००३

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,शहर विभाग १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,शहर विभाग १, विद्युतभवन, मिलकॉर्नर,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| मुख्याध्यापक,गुजराती विद्या मंदिर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उत्तरवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | मुख्याध्यापक,गुजराती विद्या मंदिर, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.०४.२०१० |
| ५ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती

अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. मुख्याध्यापक,गुजराती विद्यामंदिर, औरंगाबाद / मुख्याध्यापक, गुजराती कन्या शाळा,औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अर्जुन साहेबराव नवपुते,<br>रा.घारदोंन, ता.जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. १८.०२.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये पंचायत समिती कार्यालय,औरंगाबाद

अंतर्गत राबविलेल्या तांडावस्ती सुधार योजना व दलीत वस्तीसुधार योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामाची गावनिहाय माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. माहितीचा कालावधी सन २००४ ते अर्जाच्या तारखेपर्यंतचा आहे. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे अपिलार्थी यांनी नमूद केल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांनी दि. १२.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये कलम ७(१) नुसार विहित मुदतीत ₹२१८२/- इतक्या शुल्काचा भरणा करावा व माहिती हस्तगत करावी, असे कळविल्याचे दिसून येत आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी शुल्काच्या रकमेचा भरणा केलेला दिसून येत नाही. तरी शुल्काचा भरणा करुन अपिलार्थीने त्यांना हवी असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी, असे आयोगाचे निदेश आहेत.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अर्जुन साहेबराव नवपुते,मु.पो.घारदोंन,ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख लईक अहेमद, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महानगरपालिका,वॉर्ड एच,
रोड बिल्डींग ऑर्डर, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
रोड बिल्डींग ऑर्डर,
महानगरपालिका, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२८० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. १२.०५.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना अपुरी माहिती मिळाली आहे. तसेच," किती लाखाची ऑर्डर झाली, याचा उल्लेख नाही" असे मोघमपणे द्वितीय अपील अर्जाच्या ८(एक) या रकान्यामध्ये नमूद केले आहे. या रकमेचा जन माहिती अधिकारी तथा अभियंता, वॉर्ड एच यांच्याकडील ज्या कागदपत्रामध्ये उल्लेख आहे, ती कागदपत्रे त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच एक महिन्याच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी, असे आयोगाचे निदेश आहेत.

या टप्प्यावर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख लईक अहेमद, गल्ली नं.४, आसेफिया कॉलनी (घाटी),औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी,महानगरपालिका,वॉर्ड एच,रोड बिल्डींग ऑर्डर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, रोड बिल्डींग ऑर्डर,महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तानसेन सुकलाल पारधी, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस आयुक्त,ठाणे शहर, ठाणे.

जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस उपायुक्त (मुख्यालय),
पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२८१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २२.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

यापूर्वी अपिलार्थी श्री. तानसेन सुकलाल पारधी यांच्या अपील क्र.५०३/२०१०,दि.०६.०५.२०११, ५२४/२०१०,दि.१०.०५.२०११,५४४/२०१०,दि.११.०५.२०११,

५७३/२०१०, दि.१२.०५.२०११,५८०/२०१०, दि. १३.०५.२०१० या द्वितीय अपिलांसंदर्भात आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या दरम्यान जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),ठाणे शहर यांनी आयोगास अपिलार्थीच्या अपील क्र. २५१७/१० ते २५२२/१० या अपिलासंदर्भात दिनांक १४.१२.२०१० रोजी आयोगाच्या कोकण खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीचा संदर्भ देऊन सदरची अपिले निकाली काढण्यासंदर्भात युक्तिवाद सादर केल्यामुळे ती अपिले आयोगाने निकाली काढलेली आहेत.

तथापि प्रस्तुत विचाराधीन अपिलासंदर्भात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे त्याचप्रमाणे सदर अपिलाची आयोगाच्या कोकण खंडपीठापुढे सुनावणी झाली किंवा कसे, याचा बोध होत नाही. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त मुख्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी वर नमूद केलेल्या सर्व बाबी विचारात घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर आतापावेतो सुनावणी घेऊन निर्णय पारित केला नसल्यास अपिलार्थीच्या दि. २२.०१.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त मुख्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त मुख्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या दि.२२.०१.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तानसेन सुकलाल पारधी,प्लॉट नं. ६, गंगाबावडीजवळ, वसुंधरा कॉलनी, छावणी, औरंगाबाद-४३१ ००२.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त,ठाणे शहर, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त मुख्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
नूतन बहुउद्देशिय विद्यालय,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (मा.),
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२८२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.०६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६.०८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणात राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे विचाराधीन द्वितीय अपिलासंदर्भातील माहितीअर्जाची दि. ११.०८.२००९ रोजी सुनावणी झाली होती. त्यामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा, अशा सूचना दिल्या आहेत. याबरहुकूम जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी दि. १५.०२.२०१० रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १८.०२.२०१० रोजी माहिती देण्यात यावी, असा निर्णय दिला आहे. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नुतन बहुउद्देशिय विद्यालय,औरंगाबाद उपस्थित होते. यावर माहिती मिळाली नाही,म्हणून द्वितीय अपिल पुन्हा दि. २८.०५.२०१० रोजी अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जानुसार १९९० ते २००८ या कालावधीची एकूण १३ मुद्यांवर शाळेशी संबंधित माहिती मागितली आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय देण्यात आलेले आहेत. यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, एन-६,सिडको,ई-२३/१०,संभाजी कॉलनी,नवीन औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,नूतन बहुउद्देशिय विद्यालय,सिडको, एन-११,औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद, औरंगाबाद.

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. म.सं.राख, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),
मुंबई.

जन अपिलीय अधिकारी, :
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय),
मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत.दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक

वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. म.सं.राख, द्वारा जी.एन.घुगे, प्लॉट नं.जी-८, सिडको,एन-४,औरंगाबाद,

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु, पॉईट, ३ रा मजला,सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कलजवळ, रोड नं.८,सायन,मुंबई-२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी,महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु, पॉईंट, ३ रा मजला, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कलजवळ, रोड नं.८,सायन,मुंबई -२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अब्दुल जावेद अब्दुल वाहेद, : अपिलार्थी
रा.कन्नड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापिका,
हजरत सिद्दीकी शाह उर्दू प्राथमिक शाळा, कन्नड,
जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त केल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ११.०१.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये शालेय पोषण आहाराबाबत हजरत सिद्दीकी शाह उर्दू,प्राथमिक शाळा, कन्नड, जि.औरंगाबाद शाळेशी संबंधित ४ मुद्यांवर माहिती मागितली आहे. द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना माहिती मिळाली आहे, असे दिसून येत आहे. तथापि त्यांना मुद्दा क्र. २,३ व ४ शी संबंधित माहिती पूर्ण मिळाली नाही, असे मोघमपणे नमूद केले आहे. नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे, याबाबत त्यांना पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल. तदनंतर पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थी यांचा मूळ अर्ज विचारात घेऊन देय होत असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल जावेद अब्दुल वाहेद, भाजी मंडई, कन्नड, ता.कन्नड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,हजरत सिद्दीक शाह उर्दू प्राथमिक शाळा, कन्नड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रंगनाथ त्रिंबक सोनवणे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
माध्यमिक/प्राथमिक शाळा,
खामगाव, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, फुलंब्री,
जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०४.२००९ (फेरसादर,दि.०३.०६.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक नसलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, फुलंब्री,जि.औरंगाबाद यांच्याकडे अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक नसलेल्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रंगनाथ त्रिंबक सोनवणे, एफ-५८/०४, आयोध्यानगर, एन-७,सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,माध्यमिक/प्राथमिक शाळा,खामगाव, ता. फुलंब्री, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, फुलंब्री, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुबोध दिनेश उर्फ दिगंबर गीते,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष भूसंपादन अधिकारी (जा.प्र.),<br>जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विशेष भूसंपादन अधिकारी (जा.प्र.), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद- श्री. बी.बी.पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या दि. ०५.१२.२०११ रोजीच्या लेखी युक्तिवादाद्वारे आयोगास अवगत केले की, अपिलार्थीस संबंधित संचिका क्रमांक अे आर ४/९९ त्यांच्या कार्यालयात बोलावून दाखवण्यात आली व आवश्यक कागदपत्र त्यांना देण्यात आली आहेत.त्याचप्रमाणे प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस समक्ष संचिका पहावी असे सांगितले तसेच अर्जदारास हवी असलेली कागदपत्रे - अंतिम निवाडयाची प्रत,जमीन संपादनाचा नकाशा मोफत पुरविण्यात आला आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुबोध दिनेश ऊर्फ दिगंबर गीते, 'मोनालिसा',४८, समर्थनगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी (जा.प्र.), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुनिल शिवाजी काकडे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,मेहुणाराजा,
ता.देऊळगावराजा,जि.बुलडाणा

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा माहिती अपिलीय अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय,बुलडाणा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२८७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०४.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०६.२०१० (फेरसादर,दि.०१.०७.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. १५.०६.२०१० रोजी द्वितीय अपील केले आहे. त्यामध्ये त्यांना माहिती समाधानकारक मिळाली नाही, असे नमूद केले आहे. अपिलार्थी यांच्या दि. २३.०३.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावरुन प्लॉट नं. ६८९ कोणत्या आधारे नावे केला. त्यासंदर्भात पुरवणी कागदपत्रांच्या प्रती मागितल्या आहे. यावर जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामसेवक, मेहुणाराजा, पंचायत समिती, देऊळगावराजा यांनी अपिलार्थीस दि. १३.०५.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविल्याचे आढळून येत आहे. त्यामध्ये कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून मागितलेल्या माहितीच्या दस्ताची पाहणी करावी, असे कळविल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी दि. ०४.०५.२०१० रोजी जिल्हा माहिती अधिकारी,बुलडाणा यांच्याकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत आहे. त्यामध्ये त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची व्याप्ती वाढविल्याचे दिसून येत आहे.या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक आहे, असे आयोगास वाटत आहे. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. यासाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बुलडाणा यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांच्याकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज, त्यांचा प्रथम व द्वितीय अपील यांच्या छायांकित प्रती पाठविण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बुलडाणा यांनी अपिलार्थीच्या दि.०४.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल शिवाजी काकडे,२०/७, स्वामी विवेकानंदनगर,एन-१२,हडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,मेहुणराजा, ता.देऊळगावराजा,जि.बुलडाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बुलडाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अब्दुल ताहेर अब्दुल करीम शेख, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वफ्क अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद -श्री. एस.एन.जफर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येत आहे. यासाठी सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल ताहेर अब्दुल करीम शेख,चौकशी आयोग, क्वॉर्टर नं.३,इंद्रप्रस्थ बिल्डींग, निजाम बंगला, छावणी परीसर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सैय्यद मोबिनोद्दीन सै.अल्लाउद्दीन, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.भाऊसाहेब थोरात, नायब तहसीलदार (म) | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. विसपुते, अ.का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०५.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, दि. २३.०४.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी त्यांनी केलेल्या दि. २०.११.२००९ व ११.०३.२०१० रोजीच्या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील मागितला आहे. त्याचप्रमाणे सदरील प्लॉटींग धारकाने आतापर्यंत कोणकोणते दस्तावेज तहसील कार्यालयास दाखल केले आहेत, त्या कागदपत्रांची माहिती मागितली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन दि. ०६.०७.२०१० रोजी सात दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती द्यावी, असा निर्णय घेतला आहे.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,औरंगाबाद यांना सदरच्या बाबी अभिलेखात छानननी करुन अपिलार्थीस माहिती तात्काळ देण्याची व्यवस्था करावी लागेल. अपिलार्थी यांनी मागितलेल्या मुद्यांमध्ये व्यापक जनहित आहे, असे आयोगास दिसून येत आहे. भविष्यात माहिती अधिकार अधिनियमांतर्गत मागितलेल्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत यथायोग्य प्रतिसाद देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना दक्ष राहावे लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची एक प्रत हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात माहिती अधिकार अधिनियमांतर्गत मागितलेल्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत यथायोग्य प्रतिसाद देण्यासाठी दक्ष राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सैय्यद मोबीनोद्दीन सै.अलाउद्दीन, घर नं. १-१२-७१, जुना बाजार, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आण्णासाहेब किसनराव शिंदे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. राजेंद्र महाजन,कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.त्यांनी आयोगास प्रकरणात पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यासाठी आयोगाने सुनावणीची पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला याची संबंधितांना नोंद घ्यावी, असे आयोगाचे निदेश आहेत. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आण्णासाहेब किसनराव शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ, संजयनगर, मुकुंदवाडी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती प्रतिभा रामचंद्र देशमुख, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
आरोग्य विभाग,
जिल्हा परिषद, जालना

जन अपिलीय अधिकारी, :
आरोग्य विभाग,
जिल्हा परिषद, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२९१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांचा प्रथम अपील अर्ज जिल्हा परिषद, जालना आरोग्य विभागाकडे दाखल केला आहे तथापि यावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. ही बाब अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्येही नमूद केली आहे. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या अपिलासंदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. याकरिता प्रकरण जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,जालना यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीच्या दि.०७.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ.प्रतिभा रामचंद्र देशमुख,फ्लॅट ए-६, निर्माण हाऊसिंग सोसायटी, सहकारनगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विशाल कडूबा पाखरे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता (सिंचन),
जिल्हा परिषद सिंचन उपविभाग, सिल्लोड,जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता(सिंचन),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअभियंता (सिंचन),जिल्हा परिषद, उपविभाग,सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सिंचन),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २९.०१.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ व्यक्ती - जिल्हा परिषद सिंचन उपविभाग,सिल्लोड येथे कार्यरत असलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांच्या संदर्भात चार मुद्यांवर विविध माहिती मागितली आहे. या उपविभागात एकूण चार स्थापत्य अभियांत्रिकी सहायक कार्यरत आहेत. त्यांच्यासंदर्भातील माहिती देण्याकरिता ₹५२/- चा भरणा करावा, असे अपिलार्थीस दि. २६.०२.२०१० रोजी कळविले आहे. अपिलार्थी यांनी यावर प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकरी यांनी दि. ११.०५.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस विनाशुल्क माहिती देण्यात यावी. त्याप्रमाणे अपिलार्थीस दि. १८.०५.२०१० रोजी माहिती देण्यात आलेली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विशाल कडूबा पाखरे,सी-५७,जुनी पोलीस कॉलनी, एन-७,सिडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (सिंचन),जिल्हा परिषद, उपविभाग, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(सिंचन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भगवान दामोधर गायकवाड, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव,
भारतीय शिक्षण संस्था,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अध्यक्ष,
भारतीय शिक्षण संस्था, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२९३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांचे प्रथम अपील भारतीय शिक्षण संस्थेकडे केल्याचे दिसून येत आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्य.),जि.प.औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन निर्णय घेणे आयोगास योग्य वाटते. त्यामुळे शिक्षणाधिकारी (माध्य.),जि.प.औरंगाबाद यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. यासाठी अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यासंदर्भातील प्रथम अपिलाच्या प्रतीसह प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),जि.प.औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १८.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भगवान दामोधर गायकवाड, ५-८-२१३५,दिपनगरी, विमाननगर,न्यु हायस्कुलमागे, विमानतळासमोर,चिकलठाणा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी,सचिव,भारतीय शिक्षण संस्था,हडको,एन-१२,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यासंदर्भातील प्रथम अपिलाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील,रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय,लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक,<br>पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोग गंभीर दखल घेत आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ ची माहिती दुसऱ्या अर्जासंदर्भात मिळाली आहे. त्यांना खालील माहिती आवश्यक आहे.

१) १.पोलीस अधीक्षक कार्यालयातील जावक रजिस्टरची प्रत (ज्यामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी,उदगीर यांच्या पत्र क्र.वाचक ११७०/०९ ची नोंद असलेले पृष्ठ)
   २.वरील पत्रावर पोलीस अधीक्षक कार्यालयाचा आवक स्टँप व संबंधित अधिकाऱ्याचा शेरा असलेल्या पृष्ठाची प्रमाणित प्रत.
२) उपविभागीय पोलीस अधिकारी,उदगीर यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर यांना पाठविलेल्या पत्र क्र. ११६९ अ व ११६९ब ही दोन पत्रे ज्या पत्रासोबत पाठविली आहेत, त्या कव्हरींग लेटरची प्रत.
३) पोलीस अधीक्षक, लातूर कार्यालयातील रजिस्टरच्या ज्या पृष्ठावर वरील अनु.२ मध्ये नमूद केलेल्या पत्राची नोंद आहे. त्या पृष्ठाची झेरॉक्स प्रत.
४) उपविभागीय पोलीस अधिकारी, उदगीर यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयास पाठविलेले पत्र क्र. वाचक ५२८/१० दि. २१.०४.२०१० हे पत्र प्राप्त झाल्याची आवक रजिस्टरच्या ज्या पृष्ठावर नोंद आहे. त्या पृष्ठाची झेरॉक्स प्रत, त्याचप्रमाणे सदरच्या पत्राची प्रत.
५) उपविभागीय पोलीस अधिकारी, उदगीर यांचे पत्र क्र. २३२८/९, दि. २५.०९.२०१० जे लातूर पोलीस अधीक्षक कार्यालयास प्राप्त झाले, त्याची प्रत.

वरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे, असे आयोगाचे मत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी लागेल. त्याचप्रमाणे अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत माहिती देण्यात आली नाही. त्यामुळे ती अपिलार्थीस कलम ७(६) नुसार विनामूल्य देय होत आहे. या माहितीकरिता स्वीकारलेले शुल्क ₹५०/- अपिलार्थीस परत करावे लागेल.

जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक यांनी दि. २२.०५.२०११ रोजीच्या प्रथम अपिलासंदर्भातील निर्णयामध्ये दोन आठवडयात माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केल्याचे दिसून येत आहे. आजपर्यंत माहिती मिळाली नाही, असे अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले असून विलंबाकरिता संबंधितांविरुध्द दंडात्मक कार्यवाही करावी, अशीही विनंती आयोगास केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केलेली नाही. याद्वारे अधिनियमातील कलम ७(१)चा भंग झालेला आहे. अधिनियमातील कलम २०(१)नुसार ते शास्तीस पात्र ठरत आहेत. त्यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा त्यांचा खुलासा त्यांना अधिनियमातील कलम २०(१)च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून जिल्हा पोलीस अधीक्षक, लातूर यांच्यामार्फत आयोगास सादर

करावा लागेल. जिल्हा पोलीस अधीक्षक, लातूर यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना हे आदेश तामिल करावेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

३) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहितीची एक प्रत अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

४) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केलेली नाही. याद्वारे अधिनियमातील कलम ७(१)चा भंग झालेला आहे. अधिनियमातील कलम २०(१)नुसार ते शास्तीस पात्र ठरत आहेत. त्यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा त्यांचा खुलासा त्यांना अधिनियमातील कलम २०(१)च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून जिल्हा पोलीस अधीक्षक, लातूर यांच्यामार्फत आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सादर करावा लागेल.

५) जिल्हा पोलीस अधीक्षक, लातूर यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना हे आदेश तामिल करावेत.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील,एन९,एच १६४/०३, श्रीकृष्णनगर,टिव्ही सेंटर चौकाजवळ,सिडको,औरंगाबाद (म.रा.)

२. जन माहिती अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दिपक देविदास गवई,रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती,लोणार, जि.बुलडाणा | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),<br>जिल्हा परिषद, बुलडाणा | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दिपक देविदास गवई | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० (अमरावती खंडपीठाकडे प्राप्त)<br>दि. ०५.१०.२०१० (औ.बाद खंडपीठाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.या बाबीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. अपिलार्थी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोणार यांच्याकडून एकूण ७ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. माहिती अपिलार्थी यांच्या स्वत:बद्दलची आहे. या करिता ₹५८/- इतके शुल्क भरणा करावे, असे अपिलार्थीस कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा रोखीने करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी ते शुल्क जन माहिती अधिकारी यांनी स्वीकारण्याचे नाकारले. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी निर्णय दिला आहे की, मनीऑर्डरद्वारे पाठविलेले शुल्क ₹५८/- स्वीकारण्यात यावे व माहिती देण्यात यावी. त्याप्रमाणे त्यांना माहिती मिळाली आहे. परंतु १२३ दिवसांच्या विलंबाने त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे.त्यांना खालील मुद्यासंदर्भातील माहिती अद्यापही मिळाली नाही.

१) दि. २९.०४.२०१० रोजी कार्यालयात उपस्थित राहून रुजू करुन घेण्यासाठी गेलो असता, त्यांना रुजू करुन घेण्यात आले नाही. त्याबाबतचे अहवाल/शासननिर्णय/परिपत्रकाच्या छायाप्रती.

२) अपिलार्थी यांची सेवापुस्तिका व अंतिम वेतन प्रमाणपत्राच्या प्रती ज्या पत्रासोबत बुलडाणा येथे पाठविण्यात आल्या त्या पत्राची प्रत किंवा जा.क्र.इत्यादीचा तपशील ज्या पृष्ठावर आहे त्या पृष्ठाची छायाप्रत

३) जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या संकेतस्थळाचा तपशील.

वरील माहिती अपिलार्थीस देण्यात यावी, अशी त्यांनी आयोगासमोर त्यांच्या युक्तिवादात विनंती केली. त्याचप्रमाणे एकूण १२३ दिवसांच्या विलंबाने माहिती मिळाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडाची कार्यवाही करण्यात यावी, अशीही विनंती केली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस वर नमूद केलेली माहिती देय होत आहे. या माहितीच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्या लागतील. त्याचप्रमाणे अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचेकडून स्वीकारलेले शुल्क ₹५८/- त्यांना परत करावे लागेल. त्याचप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झाला आहे. याची कारणमिमांसा विचारात घेणे आवश्यक आहे. याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बुलडाणा यांनी चौकशी करुन संबंधित जन माहिती अधिकारी किंवा त्यांना या प्रकरणी सहाय्य करणारे कर्मचारी/अधिकारी ज्यांच्याकडून हा प्रमाद घडला आहे,

त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करावी, असे आयोगाचे निदेश आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

६) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केलेल्या माहितीच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.तसेच अपिलार्थी यांनी भरणा केलेले ₹५८/- इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत करावे.

७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बुलडाणा यांनी वर नमूद केल्याप्रमाणे प्रकरणात चौकशी करुन संबंधित जन माहिती अधिकारी किंवा त्यांना या प्रकरणी सहाय्य करणारे कर्मचारी/अधिकारी यांच्याकडून प्रमाद घडला आहे, असे आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिपक देविदास गवई, द्वारा श्री. ए.ए.नरवाडे, पोस्टमन,हेडपोस्ट ऑफीस, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,लोणार, जि.बुलडाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.), जिल्हा परिषद, बुलडाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,बुलडाणा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मच्छिंद्रनाथ रंगनाथ जाधव, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय/परिमंडळ),
पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. बी.एस.शेजूळ,वरिष्ठ लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - पोलीस उपआयुक्त (मु.), औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६.१०.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात पोलीस भरती सुरु असल्यामुळे आयोगाकडील सुनावणीस अनुपस्थित राहण्याची व प्रतिनिधीस उपस्थित राहण्याची परवानगी मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.बी.एस.शेजूळ, वरिष्ठ लिपीक यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना एकूण तीन वेळेस उपलब्ध करुन दिलेली आहे व अपिलार्थी हे त्यांच्या विभागामध्ये कार्यरत आहेत. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना विहित मुदतीत माहिती देण्यात आली नाही, म्हणून त्यांनी अपील केल्याचे दिसून येत आहे. तथापि त्यांना एकूण ३४ पृष्ठांची माहिती मिळाल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मच्छिंद्रनाथ रंगनाथ जाधव,सरफाज कॉम्प्लेक्सच्या बाजूला, जाधव निवास, फाजलपूरा, एस.टी.कॉलनी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मु.), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बी बी सोनवणे, : अपिलार्थी
रा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभिंयता ,लघुपाटबंधारे स्था.स्तर उपविभाग,
औरंगाबाद, फुलंब्री
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभिंयता लघुपाटबंधारे स्था. स्तर
औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२९७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बी बी सोनवणे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभिंयता , लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. आयोगाने या बाबीची गंभीर दखल घेतली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, औरंगाबाद यांनी दि. १६.०९.२०१० रोजी सुनावणी घेतली आहे. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते, असे दिसून येत आहे. प्रथम अपिलावरील सुनावणीनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे.

"सदर प्रकरणी अपिलार्थीनी दि. २२.०७.२०१० अन्वये लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग,औरंगाबाद यांचेकडे माहितीची मागणी केली आहे. संबंधित उपविभागाने सदर माहिती त्यांचे कार्यालयाशी संबंधित नसल्याचे अपिलार्थींना त्यांचे पत्र क्र. माअ/२७३ दि. २६/७/१० अन्वये कळविले आहे. परंतु सदर माहिती ल.प.(स्था.स्तर) उपविभाग खुलताबाद यांची असल्याचे समजते त्यावरुन श्री एस.एम बोरुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थींना त्यांचे मूळ अर्जाप्रमाणे आपले उपविभागातील अभिलेखाप्रमाणे माहिती ०१/१०/२०१० पर्यंत अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात यावी व अपिलार्थीनी लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग खुलताबाद यांचे कार्यालयाशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी." अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य केली. तसेच या कामाची पाहणी केली असे युक्तिवादात आयोगास अवगत केले. तथापि अपिलानंतर त्यांना माहिती मिळाली नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोगास असेही दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी माहितीची मागणी दुसऱ्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभिंयता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग, औरंगाबाद फुलंब्री यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही, असे अपिलार्थीस विहित मुदतीत कळविले आहे. अपिलार्थीचा अर्ज संबंधित उपविभागाकडे अधिनियमातील कलम ६(३) नुसार वर्ग करणे आवश्यक होते. तथापि त्यांना सदरची माहिती कोठे आहे, हे ज्ञात नसल्यामुळे केले नसावे. ही बाब विचारात घेता जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी खुलताबाद कार्यालयाकडे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध असल्यामुळे त्यांच्या कार्यालयात माहितीची पाहणी करावी, असा निर्णय दिला आहे, ही बाब आयोगास योग्य वाटते. अपिलार्थी यांनी माहितीची पाहणी केली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी.बी.सोनवणे,प्लॉट.सी-१९,४-३५-४०२,गजानननगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता , लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. एकनाथ भानुदास अमिलढगे,<br>रा.गोलटगाव,ता.जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार (संगायो प्रशासन), जिल्हाधिकारी<br>कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (सा.प्र.),<br>जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार (संगायो प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद-श्रीमती मंजुषा मुथा | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपजिल्हाधिकारी (सा.प्र.), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहे. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (संगायो प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी श्री एकनाथ भानुदास अमिलढगे मु पो गोलटगाव ता. जि. औरंगाबाद यांनी दिनांक ४ मे २०१० रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज दिला त्या अनुषंगाने अपिलार्थीस दिनांक ५ मे २०१० रोजी शासन निर्णयाच्या प्रती पुरविण्यात आल्या. यानंतर अपिलार्थी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-६-२०१० रोजी माहिती न मिळाल्यामुळे अपील अर्ज केला. त्यामध्ये अपिलार्थी यांनी शासननिर्णयाची प्रत मागीतली होती. त्यांना प्रत देण्यात आली तथापि अपिलार्थीने अर्जामध्ये प्रश्नोत्तर स्वरुपात माहिती मागितल्यामुळे देता येत नसल्याबाबत अभिप्राय देण्यात आले यानंतर मा.प्रथम अपिलीय अधिकारी यांना दिनांक ७ जूलै २०१० रोजी अपिलार्थी यांना स्थाई आदेश संचिका अवलोकन करण्यास देऊन हवी असलेली माहिती पुरविणेबाबत आदेशित केले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. १४ जुलै २०१० रोजी अपिलार्थीस एस.ओ.फाईल निरीक्षण करुन हव्या असलेल्या शासन निर्णयाच्या प्रती हस्तगत करण्याबाबत लेखी कळविले. या पत्राच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी कार्यालयातील एस.ओ. फाईलचे स्थळ निरीक्षण केले. त्यानंतर अपिलार्थी यांनी त्यांच्या कार्यालयात कोणतीही माहिती मागितली नाही. सबब,अपिलार्थी यांना अर्जात नमुद केलेल्या शासन निर्णयाच्या प्रती विहित मुदतीत पुरवल्या आहेत. तसेच अपिलार्थीस एस.ओ. फाईलचे स्थळ निरीक्षण करण्यास दिले. जन माहिती अधिकारी यांनी माहिती विहित वेळेत पुरविली असल्यामुळे अपिलार्थीचे अपील नामंजूर करण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहितीची पाहणी देण्यात आल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एकनाथ भानुदास अमिलढगे, मु.पो.गोलटगाव,ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (संगायो प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सा.प्र.), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाश प्रभाकरराव सोनटक्के, : अपिलार्थी
रा. भराडी, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, वर्ग-१,
पंचायत समिती, सिल्लोड

जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),
जिल्हा परिषद,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीस अपूर्ण माहिती मिळाली आहे व अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १०.०६.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),जिल्हा परिषद,औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१०..०६.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश प्रभाकरराव सोनटक्के,मु.पो.भराडी, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद-४३१११२.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१,पंचायत समिती, सिल्लोड, जि.औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. काशिनाथ दगडू दास (रक्षक),<br>औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह,औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग,<br>औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कारागृह उपमहानिरीक्षक, म.रा.पुणे-१ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - स्वीय सहायक, कारागृह उपमहानिरीक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह,औरंगाबाद - श्री. बा.दि.केदारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कारागृह उपमहानिरीक्षक,मध्य विभाग,औरंगाबाद | | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०८.१०.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १५.०६.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये एकूण ८ मुद्यांवर आस्थापना व सेवाविषयक बाबीबाबत त्यांच्या विभागाची माहिती मागितली आहे. अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या विभागामध्ये कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. अपिलार्थीस तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.०७.२०१० रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध माहिती पुरविलेली आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

प्रकणात कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.२१.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. अपिलावर कारागृह उपमहानिरीक्षक, मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा कारागृह उपमहानिरीक्षक, मध्यवर्ती कारागृह औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.२१.०८.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काशीनाथ दगडू दास(रक्षक),औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहायक, कारागृह उपमहानिरीक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कारागृह उपमहानिरीक्षक, मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाशचंद्र चांदमल बोथरा, : अपिलार्थी
रा.गंगापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद,गंगापूर,
जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. या बाबीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

अपिलार्थी यांनी दि. ०८.१२.२०११ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगास विनंती केली आहे की, वैयक्तिक कारणामुळे ते या सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही त्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात यावी. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाशचंद चांदमल बोथरा,राजीव गांधी चौक, नगर परिषद, शॉपींग सेंटर गाळा क्र.१ व ३, गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, : अपिलार्थी
रा.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, पैठण, जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण,
जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि.०८.०६.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २००९ ते दि. ०८.०६.२०१० या कालावधीची खालील २ मुद्यांवर माहिती मागितली आहे.

१) नाथ षष्ठी यात्रा मार्च, २०१० साठी नगर परिषद पैठणला एकूण प्राप्त झालेल्या निधीसंदर्भात माहिती.

२) खर्च झालेल्या निधीचे सविस्तर विवरण

अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, पैठण यांनी सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती व्यापक जनहिताच्या दृष्टीने महत्त्वाची आहे, असे आयोगाचे मत आहे. यास्तव ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या माहितीच्या प्रती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्या. खर्च झालेल्या निधीच्या कामनिहाय विनियोगाच्या तपशीलाची माहिती (जसे काम पूर्णत्त्वाचे प्रमाणपत्र, विनियोग प्रमाणपत्र, वरिष्ठ कार्यालयास सादर केलेल्या अहवालाची माहिती) अपिलार्थीस देण्यात यावी, असे आयोगाचे निदेश आहेत.

प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केलेली नाही. याद्वारे अधिनियमातील कलम ७(१)चा भंग झालेला आहे. अधिनियमातील कलम २०(१)नुसार ते शास्तीस पात्र ठरत आहेत. त्यांना शास्ती ₹२५,०००/- का लावण्यात येऊ नये याबाबतचा त्यांचा खुलासा त्यांना अधिनियमातील कलम २०(१)च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून मुख्याधिकारी, नगर परिषद,पैठण यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल. जन माहिती अधिकारी यांना सदर आदेशाची प्रत तामिल करण्याची जबाबदारी मुख्याधिकारी, नगर परिषद,पैठण यांची राहील.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१)चा भंग केला असल्यामुळे त्यांना ₹२५,०००/- शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा त्यांचा खुलासा त्यांना अधिनियमातील कलम २०(१)च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण यांच्यामार्फत आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, मु.पो.'स्वयंभू' निवास जैनपुरा पैठण, ता.पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद, पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विष्णू नागोजी म्हस्के,<br>रा.कन्नड,जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,तहसील कार्यालय,कन्नड,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विष्णू नागोजी म्हस्के | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय,कन्नड, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.या बाबीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. अपिलार्थी उपस्थित आहेत. त्यांना माहिती मिळाली नाही, असे त्यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले, त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना ₹२५,०००/- दंड लावावा, अशी विनंती केली आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.पुढील सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विष्णू नागोजी म्हस्के, मु.समर्थनगर, कन्नड,ता.कन्नड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,कन्नड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,उपविभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रमेश भीमाशंकर गुळवे,रा.औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी संचालक,
दि महाराष्ट्र स्टेट को-मार्केटिंग फेडरेशन लि.मुंबई

जन अपिलीय अधिकारी तथा :
सरव्यवस्थापक (प्रशासन वित्त),
दि महाराष्ट्र स्टेट को-मार्केटिंग फेडरेशन लि.मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २१.०६.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये सन १९९८-२०१० या कालावधीची एकूण ८ मुद्यांवर दि महाराष्ट्र स्टेट को-मार्केटिंग फेडरेशन लि.मुंबई कार्यालयाशी संबंधित विविध माहिती मागितली आहे. सदरच्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक (प्रशासन), दि महाराष्ट्र स्टेट को-मार्केटिंग फेडरेशन लि.मुंबई यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कलम ८(१)(छ)(ज) प्रमाणे अपिलार्थीस देता येत नाही, असे कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा सरव्यवस्थापक (प्रशासन), दि महाराष्ट्र स्टेट को-मार्केटिंग फेडरेशन लि.मुंबई यांच्या दि. १६.०८.२०१० रोजीचे पत्र आयोगापुढे आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण प्रलंबित असल्याने आपणास माहिती अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमातील कलम ८(१)(ड)(छ)(ञ) मधील तरतुदीनुसार मागितलेली माहिती देता येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १३.१०.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये सदरचे प्रकरण उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित नाही, असे नमूद केले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता जन अपिलीय अधिकारी तथा सरव्यवस्थापक (प्रशासन वित्त), दि महाराष्ट्र स्टेट को-मार्केटिंग फेडरेशन लि.मुंबई यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर नव्याने सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची पुन्हा एकदा संधी देऊन यथोचित निर्णय पारित करावा, असे आयोगाचे निदेश आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०६.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेश भीमाशंकर गुळवे, सिडको,एन-८,नवभारत हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. ३२, साखरे मंगल कार्यालयासमोर, ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक,दि महाराष्ट्र स्टेट को-मार्केटिंग फेडरेशन लि.कनमूर हाऊस नरसी नाथा स्ट्रीट,मुंबई - ४०० ००९ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सरव्यवस्थापक (प्रशासन वित्त),दि महाराष्ट्र स्टेट को-मार्केटिंग फेडरेशन लि.कनमूर हाऊस नरसी नाथा स्ट्रीट,मुंबई - ४०० ००९ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक संचालक,नगर रचना,
महानगरपालिका,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक संचालक,नगर रचना,महानगरपालिका,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३०५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३०.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांचे तसेच जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे, २१, चैतन्य, गुरुनगर, सिडको,एन-८,एफ-४,औरंगाबाद
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक,नगर रचना,महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सोळंके अविनाश वेणूनाथ, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अपर पोलीस अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो,नाशिक

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपआयुक्त/पोलीस अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो,नाशिक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सोळंके अविनाश वेणूनाथ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,नाशिक | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,नाशिक | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १३.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | ३०.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ०५.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | निरंक |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२.०१.२०१० |

(मुंबई कार्यालयास प्राप्त)

दि. १७.०३.२०१०

(औ.बाद कार्यालयास प्राप्त)

(फेरसादर दि. १५.१२.२०१०)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये तत्कालीन डीवायएसपी श्री. संतोष बिसेन यांनी केलेला तपास व त्यांनी पाठविलेला स्वयंस्पष्ट अहवाल व गृहमंत्रालयाचे पत्र याच्या प्रती मागितल्या आहेत. ती जन माहिती अधिकारी यांनी प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे अधिनियमातील कलम ८(१)(छ) अन्वये देण्याचे नाकारले आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय योग्य आहे, असा निर्णय दिला आहे व अपिलार्थीस कलम ८(१)(छ)मधील तरतुदीनुसार माहिती देय होत नाही, असे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी पुढे त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, सत्र न्यायालय,जळगाव येथे त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्या प्रकरणी ते निर्दोष आढळले आहेत. शासनाने या विरोधात अपील केलेले आहे. उच्च न्यायालयामध्ये अपिलावर प्रकरण दाखल आहे. उच्च न्यायालयामध्ये नव्याने पुरावा दाखल केला जाऊ शकत नाही. या बाबी विचारात घेता त्यांनी मागितलेली माहिती त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देण्यात यावी.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,नाशिक यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दि. ३०.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये कलम ८(१)(छ)अन्वये गुप्त स्वरुपात दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा मिळालेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती देता येत नाही म्हणून नाकारली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये सदरची बाब न्यायाधीन असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी कलम ८(१)(छ)नुसार माहिती नाकारण्याच्या घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही, असा निर्णय घेतला व अपील फेटाळले. अपिलार्थी यांनी स्वतःच्या संदर्भात माहिती मागितली आहे. सत्र न्यायालयाची चौकशी पूर्ण झालेली आहे. ही बाब योग्य असल्याची खातरजमा जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,नाशिक यांना करावी लागेल. असे असल्यास चौकशी संदर्भातील जी कागदपत्रे निर्माण झाली ती शासकीय अभिलेखावर उपलब्ध असल्यामुळे सार्वजनिक स्वरुपामध्ये येतात व ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होतात. सत्र न्यायालयामध्ये चौकशी पूर्ण झाल्यामुळे या कागदपत्राचे स्वरुप गोपनीय राहत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात नमूद केलेल्या दोन बाबी म्हणजे सत्र न्यायालयामध्ये चौकशी पूर्ण झाली असून ते

निर्दोष आढळले आहेत व उच्च न्यायालयात अपील प्रकरण दाखल केले असल्याकारणाने नव्याने पुरावा विचारात घेण्यात येणार नाही, या बाबींची खातरजमा करावी व तदनंतर अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती वर नमूद केल्याप्रमाणे नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्यामुळे अपिलार्थीस त्यांना देय असलेली माहिती सशुल्क स्वीकारावी लागेल. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यापूर्वी या माहितीपोटी होणाऱ्या शुल्काची रक्कम पंधरा दिवसांच्या आत कळवावी लागेल व अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यावर ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोळंके अविनाश वेणूनाथ,द्वारा श्री.कविराज बाळासाहेब टोणगे, प्लॉट नंबर ८, सुशिला डोळयांचे हॉस्पीटल, बन्सीलाल नगर, स्टेशनरोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सैय्यद मोबिनोद्दीन सै.अल्लाउद्दीन, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,सिडको,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

विभाग नियंत्रक यांनी आज दि. ०९.१२.२०११ रोजीच्या पत्रान्वये परिवहन महामंडळाचा "प्रवाशी वाढवा" सप्ताह सुरु असल्यामुळे उपस्थित राहू शकत नाही, असे कळविले असून सुनावणीची पुढील तारीख देण्याची विनंती केली आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येऊन अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात निर्णय पारीत करणे गरजेचे आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. ११.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सैयद मोबिनोद्दिन सै.अल्लाउद्दीन, घर क्र. ०१-१२-७१, सहारा इलेक्ट्रॉनिक्सचे मागे, जुनाबाजार,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लतीफ खॉन वली मोहमद खॉन,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपअधीक्षक,<br>भूमी अभिलेख,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधीक्षक,भूमी अभिलेख,औरंगाबाद - श्री. टी.आर.साळवे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख,औरंगाबाद - श्री. एम.ए.सय्यद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०८.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४.१०.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १८.०५.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये स.नं.५२,५३,५४ संदर्भात एकूण चार मुद्यांवर माहिती मागितली आहे. यासंदर्भात दि. १०.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये माहिती मागताना संबंधित गावाचे नाव नमूद न केल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य होत नाही. म्हणून मुद्दा क्र. १ संदर्भात माहिती देता येत नाही, मुद्दा क्र. २, ३ व ४ द्वारे मागितलेली माहिती उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २५.०८.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना कार्यालयात दि. १३.०९.२०१० रोजी समक्ष उपलब्ध अभिलेखे दाखविण्यात यावेत. या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. त्यानुसार अपिलार्थीस उपलब्ध सर्व कागदपत्रे दाखविण्यात आली आहेत.

आज अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांचा दि. १४.१०.२०१० रोजीचा द्वितीय अपील अर्ज आयोगापुढे आहे. त्यामध्ये त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे, असे मोघमपणे नमूद केले आहे.आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील सर्व अभिलेखे पाहणीसाठी उपलब्ध करुन दिली आहेत, असे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लतीफ खॉन वली मोहमद खॉन,बुढ्ढीलेन, औरंगाबाद टाईम्स ऑफीसच्या बाजूला,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक,भूमी अभिलेख,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वसंतराव गणपतराव बनसोडे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी,
जि.हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, हिंगोली.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. वसंतराव गणपतराव बनसोडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जान्वये ज्ञानवर्षा शिक्षण प्रसारक मंडळाने चालविलेल्या महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्राचे संदर्भातील अनुदान व खर्चासंदर्भात काही माहिती मागितली आहे. अपिलार्थी स्वत: या शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आहेत. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाली आहे. तथापि ती अपूर्ण आहे. त्यांना खालील अद्यापि न मिळालेली माहिती मिळावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

१) पेमेंट व्हावचर (फॉर्म नं. ३१) (दि. ०१.०४.२००९ ते ३१.०३.२०१० अशा एक वर्षाच्या कालावधीची ) झेरॉक्स प्रत.

२) सन २००३ ते २००५ या कालावधीची शालेय साहित्य (सादील खर्च)खरेदीकरिता देय असलेल्या व देण्यात आलेल्या निधीची माहितीची कागदपत्रे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार उपरोक्त माहिती अपिलार्थीस देय होत आहे. संस्थेतर्फे बालकामगारांना शिक्षण देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे यामध्ये व्यापक जनहित असल्याचे दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीतील उपरोक्त माहितीशी संबंधित कागदपत्रे ज्या नस्तींमध्ये उपलब्ध आहेत, त्या सर्व संचिका राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबादच्या कार्यालयामध्ये दि. २१.०१.२०१२ रोजी राज्य माहिती आयोगाचे कक्ष अधिकारी यांच्या निगराणीखाली एक विशेष बाब म्हणून जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थितीत सकाळी ठीक ११.०० ते सायं.०५.०० या कालावधीत पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्याव्या लागतील व त्यामधून अपिलार्थीस आवश्यक असलेले काही कागदपत्रे छायाप्रतीच्या स्वरुपात विनामूल्य द्यावी लागतील.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची वर नमूद केलेली कागदपत्रे ज्या नस्तींमध्ये उपलब्ध आहेत,त्या सर्व संचिका राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद येथे दि. २१.०१.२०१२ रोजी राज्य माहिती आयोगाचे कक्ष अधिकारी यांच्या निगराणीखाली जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या उपस्थितीत सकाळी ठीक ११.०० ते सायं.०५.०० या कालावधीत अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन द्याव्यात व त्यामधून अपिलार्थीस आवश्यक असलेली काही कागदपत्रे छायाप्रतीच्या स्वरुपात विनामूल्य द्यावीत.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वसंत गणपतराव बनसोडे, रा.जयभवानी नगर,सिडको,एन-२, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जावळे रामलाल शंकरराव,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय देवगाव रंगारी,ता.कन्नड,जि.औरंगाबाद. | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा शल्य चिकीत्सक, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, देवगाव रंगारी, ता.कन्नड,जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एच.के.राठोड, स.अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५.१०.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. यासाठी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१७.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जावळे रामलाल शंकरराव,घ.नं.१-११-८६, जावळे निवास,बेगमपुरा, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, देवगाव रंगारी, ता.कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बिपीन राजाराम थोरात,रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>देवगिरी महाविद्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्राचार्य, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद - डॉ. जबदे पी.व्ही. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर

माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१६.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बिपीन राजाराम थोरात,१५-ब, सरस्वती कॉलनी, औरंगपुरा,औरंगाबाद-४३१ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना (अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेश रानोबा सावळे, : अपिलार्थी
रा.उंडणगाव, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअधीक्षक,
भूमी अभिलेख,सिल्लोड,जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधिक्षक, भूमि अभिलेख, सिल्लोड, जि.औरंगाबाद- श्री. एस.डी.वाघोदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद - श्री. एम.ए.सय्यद | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | प्रत जोडलेली नाही |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये खालील माहिती मागितली आहे.

"माझ्या मालकिची वैयक्तिक उपरोक्त मिळकत मी माझ्या स्वतःच्या खर्चाने खरेदीआधारे घेतलेली आहे. या मिळकतीत माझ्या इतर भाऊबंदाचा हिस्सा वाटा नाही. परंतु माझे मिळकतीत हिम्मत धनुबा सावळे व गणेश नथ्थु सावळे यांनी माझ्या माघारी परस्पर व विनासंमतीने संबंधित कार्यालयात स्वतःचे नाव नोंदविली त्याची सविस्तर माहिती व प्रमाणित प्रती मिळाव्यात"

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यासंदर्भात आवश्यक असलेली फेरफारच्या कार्यवाहीची नोंद रजिस्टरमध्ये घेतलेली नाही. त्यामुळे माहिती देता आली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या कार्यालयाकडे प्रशासकीय अपील केले असल्याकारणाने व ही प्रक्रिया प्रगतीपथावर असून या प्रकरणाची सुनावणी दि.१२.१२.२०११ रोजी निश्चित केलेली आहे. यासंदर्भात होणारा अहवाल सादर करण्यात येईल.

या सर्व बाबींचा विचार करता याकरिता आयोगाने या प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक राहील अन्यथा उपलब्ध कागदपत्रांवरुन वस्तुनिष्ठ निर्णय घेण्यात येईल.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख व वेळ सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल.पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीसह व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश रानुबा सावळे, रा.उंडनगाव, ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भूमि अभिलेख, सिल्लोड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. तांबे अशोक दशरथ, औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मिलींद कला व विज्ञान महाविद्यालय,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी, :
मिलींद कला व विज्ञान महाविद्यालय,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३१३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील

कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.२३.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तांबे अशोक दशरथ,गल्ली नं.६, आंबेडकरनगर,एन-७,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, मिलींद कला व विज्ञान महाविद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अंबादास राजाराम तळणकर,रा. औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय (पुरवठा विभाग),
वैजापूर, जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी, :
तहसील कार्यालय,वैजापूर, जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अंबादास राजाराम तळणकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यांच्या अनुपस्थितीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना अद्यापही मिळाली नाही तसेच त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,वैजापूर, जि.औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,वैजापूर, जि.औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१३.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंबादास राजाराम तळणकर,एन-११,सी-४,१/२,गजानननगर,हडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय (पुरवठा विभाग),वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद साबेर स.साबेर, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (घाटी),
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी, :
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०९-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद - श्री. बी.जे.साडेगावकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०.१०.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे व तशी पोचही त्यांनी दिलेली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे, असे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थी यांचे दि. २८.०७.२०११ रोजीचे पत्र आयोगापुढे आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांना माहिती मिळाली असल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी या पत्राची प्रत आयोगास अवलोकनास्तव सादर केली.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०९-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद साबेर स.साबेर,मलीक अंबर उड्डाणपुल, टाऊन हॉल,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाश नामदेव जाधव, : अपिलार्थी
रा. अंभई, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद - श्रीमती डी. डी. भालेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-१०-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये घरघुती गॅस पुरविणे योजनेअंतर्गत व कन्यादान योजनेअंतर्गत एकूण लाभार्थीची संख्या याबाबतच्या दस्तवेजाच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. मागितलेल्या माहितीचा कालावधी सन २००८ ते २०१० असा तीन वर्षाचा आहे. माहिती विस्तृत असल्याने अपिलार्थीस माहितीची पाहणी कार्यालयात देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ती पाहिली आहे. अपिलार्थी यांनी माहिती बघितली आहे व अर्ज निकाली काढण्यात यावा अशी विनंती केली आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश नामदेव जाधव, रा. अंभई, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दिलीपकुमार चंपालाल जैन (मुगदिया),<br>संपादक, सा. झटका, एस. पी. रोड, चेलीपुरा, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दिलीपकुमार चंपालाल जैन (मुगदिया) | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| | - प्रतिनिधी - श्री. एम. एस. शेळके, वरिष्ठ लिपिक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद<br>- श्री. एम. ए. सय्यद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २३-०७-२००९ च्या माहिती अर्जान्वये एकूण आठ मुद्दयावर व्यापक अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०९-११-२००९ च्या व्दितीय अपिलावर राज्य माहिती आयोग औरंगाबाद खंडपीठाकडे दिनांक ०१-०७-२०१० रोजी सुनावणी झाली होती. या सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या दिनांक ३१-०८-२००९ च्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते, या निष्कर्षाप्रत येऊन प्रथम अपील सुनावणीसाठी दिनांक ०१-०७-२०१० च्या आदेशान्वये प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात आले होते. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेशानुसार सुनावणी घेऊन दिनांक १७-०७-२०१० रोजी निर्णय दिलेला आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या एकूण नऊ मुद्दयावर विचार करुन प्रथम अपील अधिका-याने खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

"मुद्दा क्रमांक १ व २ बाबत अर्जदार यांचा अर्ज पुरेसा स्पष्ट असलेने संभ्रम निर्माण न करता तातडीने माहिती उपलब्ध करुन द्यावी व इतर बाबतीत अनुमानामध्ये नमूद अभिप्रायानुसार कार्यवाही करावी, या निदेशासह माहिती अधिकार अधिनियम २००५ अपील अर्ज दिनांक ३१-०८-०९ चा अर्ज निकाली ठेवणेत येत आहे. तसेच अर्जदार यांना वरील सर्व माहिती बाबत माहिती आता विनामूल्य देणेत यावी."

आज रोजी अपिलार्थी यांनी या निर्णयाविरुध्द आयोगास सादर केलेल्या दिनांक २०-१०-२०१० च्या अपिलावर सुनावणी ठेवण्यात आली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर दिनांक १७-०७-२००९ रोजी सुनावणी घेतल्यानंतरही त्यांना आतापर्यंत माहिती दिलेली नाही, त्यामुळे त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयानुसार मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती विनामूल्य मिळावी व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना जास्तीत जास्त दंड लावावा अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली मुद्दा क्रमांक १ व २ मधील माहिती विस्तृत स्वरुपात असल्याकारणाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर

भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडून देता आली नाही असे दिसते. तथापि सध्याचे जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद हे ही माहिती देण्यास तयार आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात आहे तसेच हि माहिती दहा वर्ष इतक्या कालावधाची आहे. अपिलार्थी यांनी माहिती नेमकी विचारली नसून सर्वसमावेशक स्वरुपाची माहिती विचारली आहे. अशी माहिती मागितल्याने सार्वजनिक प्राधिकरणाकडील साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) अन्वये अपेक्षित नाही. त्याचप्रमाणे प्रश्नार्थक स्वरुपाची खुलासेवजा स्पष्टीकरणात्मक माहिती देय होत नाही. माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्याची पाहणी करुन छायांकीत प्रती देणे योग्य ठरत होते. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांनी दिनांक १७-०७-२०१० रोजी दिलेल्या प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये मुद्दा क्रमांक १ व २ बाबत माहिती द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना निदेशीत केले आहे. तथापि तत्कलीन जन माहिती अधिका-याने आतापर्यंत माहिती दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप स्पष्टपणे विशद करण्याकरिता आयोगातर्फे सुनावणीच्या वेळी सूचित करण्यात आले. त्यावेळी त्यांनी मुद्दा क्रमांक १ व २ मधील खालीलप्रमाणे माहिती देणे त्यांना अभिप्रेत आहे अशी आयोगास विनंती केली आहे. तसेच इतर मुद्दयाबाबतच्या माहितीकरिता त्यांची मागणी नाही असेही त्यांनी आयोगास पुढे सांगितले.

परिरक्षण भूमापक (दहा) यांनी दिनांक ०१ जानेवारी २००८ ते २४-०७-२००९ या कालावधीत केलेल्या खालील कामांबाबतची माहिती

१. दहा भूमापक यांच्या बारनिशीच्या प्रती.

२. पुनर्विलोकन रजिस्टरच्या छायांकित प्रती.

३. या कालावधीत दिलेल्या पुनर्विलोकन नोटीसच्या प्रती.

४. नगरभूमापक अधिकारी यांनी तपासलेल्या मिळकतीचा तपशील.

५. उपरोक्त कालावधीत दहा भूमापकांनी दिलेल्या नोटीसच्या प्रती.

६. श्री. बांगर हे परिरक्षण भूमापक या पदावर किती कालावधीसाठी कार्यरत होते.

७. श्री. बांगर यांनी काम केलेले दैनंदिनीच्या नकला.

८. पुनर्विलोकन नोटीस, डायरीची नक्कल, मिळकत दुरुस्ती केल्यानंतर रजिस्टरमध्ये नोंद घेतल्या गेलेल्या प्रती, नकाशावर किती दुरुस्त्या केल्या त्याची संख्या.

सदरची माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत आहे. अपिलार्थी यांचा दिनांक २४-०७-२००९ रोजीचा मूळ अर्ज, त्यावर राज्य माहिती आयोग औरंगाबाद खंडपीठाकडील दिनांक ०१-०७-२०१० रोजीचा निर्णय व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांचा प्रथम अपिलावरील निर्णय इत्यादी बाबी विचारात घेता

अपिलार्थीस वरील दोन मुद्दयावरील माहितीचे सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात तीन दिवस पाहणी करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात यावेत या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. तसेच अपिलार्थी यांनीही यास संमत्ती दर्शविली आहे. पाहणी केल्यानंतर अपिलार्थीस यातील काही कागदपत्रांची आवश्यकता भासल्यास त्या सर्वाच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल.

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १७-०७-२०१० रोजी निर्णय घेतल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद श्री. बी. जी. बांगर यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. त्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे रुपये २५००० /- इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्यामार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांची राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी तीन दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-१२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीपकुमार चंपालाल जैन (मुगदिया), संपादक, सा. झटका, एस. पी. रोड, चेलीपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ममराज बन्सी राठोड, : अपिलार्थी
रा. जंगलतांडा, पोस्ट तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उपविभाग,
सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३१८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उपविभाग,<br>सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद - श्री. दत्तात्रय किशन गवळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- श्री. एम. देवेंद्रअप्पा | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १५-०९-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उपविभाग, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना दिनांक २६-१०-२०१० रोजी पोच दिलेली आहे. यावर आयोगाचे काहीही भाष्य नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ममराज बन्सी राठोड, रा. जंगलतांडा, पोस्ट तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उपविभाग, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय रामराव पतंगे, : अपिलार्थी

व्दारा, श्री. शेळके ए. एस., घर नं. १६६, जिजामाता कॉलनी, १३ वी योजना, एन-२, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कळमनुरी, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :

तालुका कृषि अधिकारी, कळमनुरी, जिल्हा हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३१९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजय रामराव पतंगे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कळमनुरी,<br>जिल्हा हिंगोली | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एकूण पाच मुद्दयावर जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कळमनुरी जिल्हा हिंगोली यांच्याकडे माहिती मागितली आहे. यापैकी त्यांना मुद्दा क्रमांक १, २, ४ व ५ या मुद्दयाची माहिती प्राप्त झालेली आहे व मुद्दा क्रमांक ३ बाबतची माहिती उपविभागीय कृषि अधिकारी, हिंगोली यांच्याकडे उपलब्ध आहे असे दिनांक २५-०८-२०१० च्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे. ती माहिती खालीलप्रमाणे आहे.

श्री. बळीराम (माधवराव रुस्तुमराव जाधव) कोंढूर तालुका कळमनुरी जिल्हा हिंगोली यांनी "शेततळे" या योजनेसाठी जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात. त्यामध्ये अर्ज व अर्जासोबतची सर्व कागदपत्रे, शेजारील शेतक-यांचे नाहरकत प्रमाणपत्र (संमतापत्र), ग्रामपंचायत ठराव, कृषि अधिकारी यांनी वेळोवेळी केलेला पाहाणी पंचनामा (सर्व्हे/रिपोर्ट), व मा. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकरी यांनी दिलेले शेततळे परवानगी प्रमाणपत्र.

या माहितीपैकी शेततळ्याची माहितीपत्रिका अपिलार्थीस यापूर्वी मिळाली आहे. अपिलार्थीस खालील माहिती अद्याप प्राप्त होणे बाकी आहे.

१. शेततळे मालकाचा ७/१२,

२. गाव नमुना ८

३. ग्रामपंचायतीने प्रसिध्द केलेल्या नोटीसीची प्रत

४. शेजारील शेतक-यांचे नाहरकत प्रमाणपत्र

५. ग्रामपंचायत ठराव

६. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

वरील माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत आहे. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाने पाठविण्याची व्यवस्था करतील ही बाब उप विभागीय कृषि अधिकारी, हिंगोली यांना पहावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

उप विभागीय कृषि अधिकारी, हिंगोली यांनी जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कळमनुरी, जिल्हा हिंगोली हे वर नमूद केल्याप्रमाणे माहितीच्या प्रती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवतील याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय रामराव पतंगे, व्दारा, श्री. शेळके ए. एस., घर नं. १६६, जिजामाता कॉलनी, १३ वी योजना, एन-२, सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उप विभागीय कृषि अधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जुनैद मिन्हाज मोबीन अहमद शेख,<br>रो हाऊस नं. ०२, अस्मीरा टाऊनशीप, मोहनलाल नगर,<br>कलेक्टर ऑफिस जवळ, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय वैद्यकीय<br>महाविद्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय वैद्यकीय<br>महाविद्यालय, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी, अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद - श्री. एस. एच. मगर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरिररचनाशास्त्र, अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०७-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २२-१०-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. अपिलार्थी यांनी दिनांक १३-०५-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक ०७-०७-२०१० रोजी अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरिररचनाशास्त्र, अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १२-०७-२०१० रोजी प्रथम अपील केले त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरिररचनाशास्त्र, अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांनी दिनांक ३०-०७-२०१० रोजी सुनावणी घेतली व सुनावणीमध्ये अपिलार्थीस शासन निर्णयाच्या प्रती दिनांक ०६-०८-२०१० पर्यंत देण्यात याव्यात असा निर्णय दिला आहे. अपिलार्थी माहिती व्यक्तिशः नेणार होते त्यामुळे त्यांना दिनांक ०९-०८-२०१० रोजी माहिती देण्यात आली.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी दिनांक २२-१०-२०१० च्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना चुकीची, अपुरी माहिती दिली असे नमूद केले आहे. याकरिता अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-१२-२०११**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जुनैद मिन्हाज मोबीन अहमद शेख, रो हाऊस नं. ०२, अस्मीरा टाऊनशीप, मोहनलाल नगर, कलेक्टर ऑफिस जवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरिररचनाशास्त्र, अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रभाकर विठ्ठलराव मगरे, : अपिलार्थी
घर नं. ४/१७/१८, मिल कॉर्नर, कोतवालपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| | - प्रतिनिधी - श्री. एम. एस. शेळके, वरिष्ठ लिपिक | | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद<br>- श्री. एम. ए. सय्यद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-०८-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १५-०६-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीकरिता दिनांक १९-०७-२०१० च्या पत्रान्वये शुल्क भरुन माहिती घेऊन जावी असे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांनी दिनांक ३०-०८-२०१० रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, मुद्दा क्रमांक १ व २ बाबतच्या माहितीच्या अभिलेख्याचा शोध पुन्हा घ्यावा व माहिती उपलब्ध झाल्यास अपिलार्थीस पुन्हा माहिती द्यावी व अन्यथा उपलब्ध नसेल तर तसे अपिलार्थीस कळवावे. अर्जदार यांना दिनांक २४-०९-२०१० रोजी माहिती उपलब्ध नसल्याबाबत कळविले आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्रयस्थाची माहिती मागितली आहे. जी माहिती उपलब्ध आहे ती जन माहिती अधिकारी यांनी दिली आहे व उपलब्ध नसलेल्या माहितीबाबत स्पष्टपणे अपिलार्थीस कळविले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-१२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रभाकर विठ्ठलराव मगरे, घर नं. ४/१७/१८, मिल कॉर्नर, कोतवालपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गुलाम अहमद अब्दुल करीम जाफरी, : अपिलार्थी
गणेश कॉलनी, पाकीजा हॉल समोर, हडको रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कार्यालय वॉर्ड क, महानगरपालिका, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
महानगरपालिका, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गुलाम अहमद अब्दुल करीम जाफरी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय वॉर्ड क, महानगरपालिका, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>महानगरपालिका, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-१०-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी गणेश कॉलनी, औरंगाबाद येथील सर्व मालमत्ता धारकांच्या मालमत्ता कराबाबतची माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००० ते २०११ असा आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १७-०८-२०१० रोजी कळविले की, मागितलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्यामुळे हव्या असलेल्या मालमत्ताधारकाची नावे व घर क्रमांक द्यावेत म्हणजे माहिती देता येईल. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक ०४-१०-२०१० रोजी कार्यालयात उपस्थित राहून कागदपत्रांची पाहणी करण्याचा निर्णय दिला आहे. त्यानुसार त्यांनी पाहणी केली आहे व कागदपत्रे प्राप्त करुन घेतली आहे, परंतु त्यांना संपूर्ण माहिती मिळाली नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी सन २००० ते २०११ अशी अकरा वर्षाच्या कालावधीतील संपूर्ण गणेश कॉलनी येथील संपूर्ण मालमत्ताधारकांची कर विषयक माहिती मागितली आहे, त्याकरिता त्यांनी तक्ताही दिला आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात घेतलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो. अपिलार्थीने मागितेल्या माहितीची पाहणी केली आहे. माहिती मोठ्या कालावधीची व सुमारे १०० लोकांची अशी विस्तृत माहिती मागितली आहे. अशी माहिती मागितल्याने सार्वजनिक प्राधिकरणाकडील साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागते, जे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार अपेक्षित नाही. अशा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. प्रसंगी माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय देण्यात आले आहेत. तरीही अपिलार्थीस माहिती पुरविण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गुलाम अहमद अब्दुल करीम जाफरी, गणेश कॉलनी, पाकीजा हॉल समोर, हडको रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय वॉर्ड क, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिलीप रंगनाथ पगारे, : अपिलार्थी
प्लॉट नं. २३, गट नं. १०५, जंजीरा, सार्वजनिक बांधकाम
गृहनिर्माण सोसायटी, सातारा परिसर, बीड बायपास रोड,
रेणुका माता मंदिर जवळ, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, कार्यालय शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप रंगनाथ पगारे, प्लॉट नं. २३, गट नं. १०५, जंजीरा, सार्वजनिक बांधकाम

गृहनिर्माण सोसायटी, सातारा परिसर, बीड बायपास रोड, रेणुका माता मंदिर जवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. साबीर हुसेन पि. अत्तार, : अपिलार्थी
२७-ब, एन-१२, प्रोफसर कॉलनी, हिमायत बागेसमोर,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तंत्रशिक्षण संचालनालय, पो. बॉ. नं. १९६७, ३,
महापालिका मार्ग, मुंबई

जन अपिलीय अधिकारी, :
तंत्रशिक्षण संचालनालय, पो. बॉ. नं. १९६७, ३,
महापालिका मार्ग, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३२४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तंत्रशिक्षण संचालनालय, पो. बॉ. नं. १९६७, ३,<br>महापालिका मार्ग, मुंबई | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>तंत्रशिक्षण संचालनालय, पो. बॉ. नं. १९६७, ३,<br>महापालिका मार्ग, मुंबई | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८-०९-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १६-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २८-१०-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली किंवा कसे हे ज्ञात होत नाही. तथापि अपिलार्थी यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १३-१२-२०११ रोजीचे पत्र आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये त्यांनी दिनांक २७-१०-२०१० रोजी दाखल केलेल्या व्दितीय अपिलासंदर्भातील माहिती त्यांना मिळाली असल्याने त्यांचे अपील निकाली काढावे अशी विनंती केली आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १३-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साबीर हुसेन पि. अत्तार, २७-ब, एन-१२, प्रोफसर कॉलनी, हिमायत बागेसमोर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय, पो. बॉ. नं. १९६७, ३, महापालिका मार्ग, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय, पो. बॉ. नं. १९६७, ३, महापालिका मार्ग, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष भाऊराव जाधव, : अपिलार्थी
रा.अंबेलोहळ, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गंगापूर, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद. औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद - डॉ. विजय क.खोमणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, जि.औरंगाबाद यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २९.०७.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये मौजे आंबेलोहळ येथे सन २००७ ते २०१० पर्यंत इंदिरा गांधी आवास योजना व राजीव गांधी आवास योजनेची माहिती मागितली आहे. संबंधित प्रकरणात झालेल्या भ्रष्टाचाराबाबतच्या चौकशी प्रकरणात त्यांच्या कार्यालयातील एकूण ९ कर्मचारी निलंबित आहेत. त्यामुळे त्यांना माहिती देता आली नाही. या प्रकरणातील सर्व अभिलेखे पोलीस स्टेशनमध्ये जमा आहेत.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी इंदिरा आवास व राजीव गांधी आवास योजनेअंतर्गत कोणकोणत्या लाभार्थींना लाभ मिळाला याची यादी व त्याबाबतचा उपलब्ध अहवाल (कामाची सद्यस्थिती- काम पूर्ण/अपूर्ण) अशी माहिती देय होत आहे.याकरिता अपिलार्थीच्या माहिती अर्जामध्ये मागितलेल्या माहितीपैकी जी उपलब्ध असेल (न्यायप्रविष्ट माहिती वगळून) त्याच्या झेरॉक्स प्रती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्या लागतील.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,गंगापूर,जि.औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या माहिती अर्जामध्ये मागितलेल्या माहितीपैकी जी उपलब्ध असेल (न्यायप्रविष्ट माहिती वगळून)त्याच्या झेरॉक्स प्रती नोंदणीकृत टपालाद्वारे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-१२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष भाऊराव जाधव,मु.पो.अंबेलोहळ, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. आझरखान शफीउल्लाखान,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.औरंगाबाद- श्री. जी.जी.मावळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद - श्री. डी.एम.पालोदकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१०.२०१० (फेरसादर दि. २८.१०.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.औरंगाबाद यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्यांनी अजिंठा अर्बन को.ऑप.बँक लि.औरंगाबाद या बँकेकडून घेतलेल्या स्वत:च्या कर्जप्रकरणाबाबत व त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या कागदपत्रांची मागणी केली आहे. अजिंठा अर्बन को.ऑप.बँक लि.औरंगाबाद ही बँक, महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० अंतर्गत निर्माण झाली आहे. या बँकेस शासनाचे भागभांडवल नाही. त्यामुळे ती माहिती अधिकार अधिनियमाखाली येत नाही. तथापि अपिलार्थी यांनी केलेल्या एका दुसऱ्या तक्रारीसंदर्भात त्यांच्या कार्यालयात जी कागदपत्रे निर्माण झाली व बँकेने दाखल केलेली कागदपत्रे अपिलार्थीस दि. १८.०८.२०१० रोजी सशुल्क दिलेली आहेत. अपिलार्थीस दि. २३.०८.२०१० रोजी सदरची माहिती प्राप्त झाली. याबाबतची पोच त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती,त्यांना देय असलेली माहिती व देण्यात आलेली माहिती या सर्वांबाबत दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन अपिलार्थीस माहिती दिल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपील फेटाळले आहे. तसेच प्रथम अपील सुनावणीच्या वेळी पुन्हा एकदा माहितीचा एक संच अपिलार्थीस देण्यात आला आहे. याबाबतची नोंद जन अपिलीय अधिकारी यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे.

आयोगापुढे करण्यात आलेल्या युक्तिवादावरुन या बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपिलामध्ये अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे मोघमपणे नमूद केले आहे. नेमके नमूद केलेले नाही. या सर्व पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आझरखान शफीउल्लाखान, रा.मोतीकारंजा, बालाजी तेल भांडारशेजारी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जगन्नाथ जयवंतराव बोबडे, | : | अपिलार्थी |
| रा. इसारवाडी,ता.पैठण, जि.औरंगाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,इसारवाडी,<br>ता.पैठण, जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती,पैठण,जि.औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०२.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,पैठण,जि.औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,पैठण,जि.औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.०२.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जगन्नाथ जयवंतराव बोबडे,रा.मु.पो.इसारवाडी, ता.पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,इसारवाडी, ता.पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. एम. ए.झाकीर,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचे कार्यालय,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. प्र.के.टापर, उपकार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ३.५ | श्री. पठाण एस.एल., उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग फर्दापूर,ता.सोयगाव,जि.औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०९.२०१० |

७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९.१०.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी,कार्यालय कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांच्याकडून फर्दापूर उपविभागाशी संबंधित दोन मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. सदरची माहिती विभागामध्ये उपलब्ध असणे आवश्यक आहे. अपिलार्थीस आजपर्यंत देण्यात आली नाही, असे आढळून येत आहे. प्रकरणात सद्यपरिस्थिती अवगत होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एम.ए. झाकीर,घर क्र. ४-७-७, मोंढा रोड, नवाबपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचे कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. असदउल्ला खॉन पिता नसरुल्लाखॉन तर्रार,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वक्फ अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद -श्री. एस.एन.जफर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा वक्फ अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. १५.०६.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दि. १३.१२.२०११ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांना सदरची माहिती प्राप्त होताच त्या माहितीचे अवलोकन करावे. त्यामध्ये काही मुद्दे अपूर्ण असल्यास त्यासंदर्भातील नेमके मुद्दे पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे व पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन उर्वरित मुद्देनिहाय माहिती द्यावी लागेल. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची एक संधी देऊन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती व त्यांना पुरविण्यात आलेली माहिती याची पडताळणी करुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर यथोचित निर्णय घ्यावा लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१५.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मो.असदउल्ला खॉन पि.मो.नसरुल्लाखॉन तर्रार, घ.रं.४/८/४८, तर्रार मंजील,नवाबपुरा,पो.राजाबाजार,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वक्फ अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शमीम खॉन, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शमीम खॉन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद - श्री. पी.के.टापर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २८.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २८.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शमीम खॉन,घर नं.१-२२-४३३,टाऊन हॉलच्या बाजूला,व्ही.आय.पी.रोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रणजित एच. मनोरे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३३१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रणजित एच. मनोरे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक, कार्यालय अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद -श्री. ए.तु.शेळके | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ०१.०१.२००८ ते २९.०७.२०१० या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयाकडे पुढीलप्रमाणे माहिती मागितली आहे. "आपल्या कार्यालया अंतर्गत येणारे विभाग व विभागा अंतर्गत येणारे उपविभाग उपविभागामार्फत करण्यात आलेल्या व चालु असलेल्या कामाची माहिती मिळणे बाबत. कामाचे नाव,कामाचे ठिकाण, कामाला मंजूर अनुदान,कामावर झालेला खर्च, विभागाचे नाव, उपविभागाचे नाव, तेथील उपअभियंत्याची नावे, त्या-त्या शाखा अभियंत्यांची नावे तसेच त्यांचा रुजुवाद दिनांक व कार्यकाळ ही माहिती. विभाग निहाय, उपविभाग निहाय, गोषवारा स्वरुपात व्यवस्थित देण्यात यावी."मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठी आहे. सदरची माहिती देण्याकरिता संबंधित सर्व कार्यालये - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद, सा.बां.(प)विभाग, सा.बां.वि.जालना, सा.बां.वि.क्र.२,जालना, जि.प. (बांधकाम) विभाग, औरंगाबाद/जालना,जागतिक बँक प्रकल्प,औरंगाबाद यांच्याकडे दि. १६.०८.२०१० रोजी विहित मुदतीत कळविले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात त्यांना माहिती मिळाली नाही, असे आयोगास अवगत केले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालयाअंतर्गत सर्व एकूण ६ विभागांतर्गत झालेल्या कामाची माहिती वर नमूद केल्याप्रमाणे सुमारे तीन वर्षांच्या कालावधीची मागितली आहे. अशाप्रकारची माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देणे अभिप्रेत आहे. कारण इतर कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत व त्या कार्यालयाशी संबंधित माहितीकरिता अपिलार्थी यांनी स्वतंत्र अर्जाद्वारे त्यांच्याकडे माहिती मागणे आवश्यक आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जावर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय देण्यात आलेले आहेत. यासंदर्भात अपिलार्थी यांनी स्वेच्छेने माहितीची व्याप्ती कमी करुन सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीची मागणी करणे आवश्यक आहे. यासाठी या प्रकरणी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर पुन्हा सुनावणी घेऊन

निर्णय घ्यावा, असे आयोगाचे निदेश आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. ०६.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १३-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रणजित एच.मनोरे,रेल्वेस्टेशन, जहागीरदार कॉलनी, मुजीब सर्व्हिसिंग सेंटरच्या बाजूला,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, कार्यालय अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भास्कर पं.ठोंबरे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,जालना | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३३२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०२.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०४.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.१०.२०१०<br>(फेरसादर दि. ०९.११.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणात अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८(१)(ख) व (ज) मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती पुरविता येणे शक्य होणार नाही, असा निर्णय घेतला असल्याचे दिसून येत

आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ भास्कर पंढरीनाथ ठोंबरे, रा.पी.-१६, टाऊन सेंटर, राज पेट्रोल पंपाचे मागे,जालना रोड,सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. हरिनारायण रामचंद्र दापकेकर,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,मुखेड,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, देगलूर, जि.नांदेड | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३३३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. हरिनारायण रामचंद्र दापकेकर | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यांच्या अनुपस्थितीची आयोग गंभीर दखल घेत आहे.

अपिलार्थी यांनी स्वतःच्या मालमत्तेची एकूण ६ मुद्यांमध्ये जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,मुखेड, जि. नांदेड यांच्याकडून माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०७.०९.२०१० रोजी प्रथम अपील केले. त्यावर सुनावणी घेतली नाही म्हणून आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. द्वितीय अपील सादर केल्यानंतर दि. १८.११.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती मिळाली आहे. परंतु ९० टक्के माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांनी संबंधितांना माहिती देण्याचे आदेश देण्यात यावेत व माहिती देण्यास विलंब झाल्याबद्दल दंड लावण्यात यावा, अशी आयोगास विनंती केली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या मौ. इटग्याळ(प.मु.) या जमिनीसंदर्भात फेरफार क्र. १०८६, दिनांक ०८.१२.१९९९ संदर्भात बॉण्डपेपरवर झालेल्या वाटणीपत्राची प्रत व त्या अनुषंगीक कागदपत्रांची माहिती एकूण ६ मुद्यांवर मागितली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमानुसार देय होत आहे. जरी माहितीचा कालावधी सन १९९९ ते २००७ असा नमूद केलेला आहे तरी अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, सदरच्या वाटणीपत्रानुसार फेरफार मंजूरीची कार्यवाही दि. १७.०१.२००७ रोजी तहसीलदार,मुखेड यांच्यापुढे झालेली आहे.यामुळे अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची कागदपत्रे तहसीलदार यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असणे आवश्यक आहे. तरी वर नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रांच्या छायाप्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे देण्यात यावी. अशी कार्यवाही जन माहिती अधिकारी पार पाडतील, असे जिल्हाधिकारी,नांदेड यांनी व्यक्तिशः पहावे, असे आयोगाचे निदेश आहेत.

प्रकरणात जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झाला असल्याने अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झालेला आहे. अधिनियमातील कलम २०(१)नुसार ते शास्तीस पात्र ठरत आहेत. त्यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा त्यांचा खुलासा त्यांना अधिनियमातील कलम २०(१)च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून जिल्हाधिकारी, नांदेड यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल. जिल्हाधिकारी, नांदेड यांनी हे आदेश संबंधितांना तामिल करावेत.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१) जिल्हाधिकारी, नांदेड यांनी संबंधित जन माहिती अधिकारी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती देतील, असे व्यक्तिशः पहावे.

२) जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहकारी अधिकारी/कर्मचारी यांनी अधिनियमातील कलम ७(१)चा भंग केला असल्यामुळे त्यांना शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा त्यांचा खुलासा अधिनियमातील कलम २०(१)च्या

परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून जिल्हाधिकारी,नांदेड यांच्यामार्फत आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरिनारायण रामचंद्र दापकेकर, एन-७, ए ११५, आय १४/०१, शास्त्रीनगर, सिडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. देवराव बंडु पारधे,रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी,<br>राज्य माहिती आयोग खंडपीठ,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसचिव,<br>राज्य माहिती आयोग खंडपीठ,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. बी.बी.राठोड,सहायक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उप सचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. सहायक जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांचा दि. १७.०८.२०१० रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १८.०८.२०१० रोजी प्राप्त झाला. या अर्जान्वये त्यांनी यापूर्वी दि. २५.०६.२०१० रोजी दाखल केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत दि. १८.०९.२०१० रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही झालेली नसल्याचे कळविले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, राज्य माहिती आयोग,खंडपीठ,औरंगाबाद यांनी दि. ०३.०२.२०११ रोजी सुनावणी घेऊन माहितीच्या संदर्भात निर्णय दिला आहे. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १३-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देवराव बंडु पारधे, एन-७,बी-१,९३ सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग खंडपीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, राज्य माहिती आयोग खंडपीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक कडुबाळ ढोले, : अपिलार्थी
रा. टेंभापूरी, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,ग्रामपंचायत,टेंभापुरी,
ता.गंगापूर,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,
जिल्हा परिषद, पाणीपुरवठा
उपविभाग,गंगापूर,जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत टेंभापुरी, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद - श्री. अशोक रामराव वाघ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, जि.प.पाणीपुरवठा उपविभाग गंगापूर,जि.औरंगाबाद - श्री. आंटद शिवानंद शिवलिंग | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २०.०७.२०१० रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये ग्रामपंचायत, टेंभापुरी,ता.गंगापूर येथे चालू असलेल्या भारत निर्माण योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेची संपूर्ण माहिती त्यामध्ये कामाची मोजमापपुस्तिका, प्राप्त झालेला निधी, अंदाजपत्रकाची माहिती, बँक पासबुक इत्यादी मागितली आहे. सदरची माहिती संकलीत करण्यास काही वेळ लागला व अपिलार्थीस जवळपास १५० पृष्ठांची माहिती विनामूल्य देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली आहे. अपिलार्थी यांनी दि. ०२.१०.२०१० रोजी दिलेली पोच त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १३-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक कडूबाळ ढोले, ग्रा.प.सदस्य,मु.पो.टेंभापुरी,ता.गंगापुर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत टेंभापुरी, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जि.प.पाणीपुरवठा उपविभाग गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विवेक पंढरीनाथ बेंद्रे, | : | अपिलार्थी |
| | प्लॉट क्रमांक ४३, गट क्र. ८९, हायकोर्ट कॉलनी जवळ, सातारा परिसर,औरंगाबाद | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विवेक पंढरीनाथ बेंद्रे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद - डॉ. ज्योत्स्ना धुळे | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, जालना यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०५.०७.२०१० व २४.०९.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये एकाच विषयावर एकसारखी माहिती मागितली आहे. त्यासंदर्भातील अपिलार्थीस त्यांच्या पहिल्या दि. ०५.०७.२०१० रोजीच्या माहिती अर्जावर दि. १२.०८.२०१० रोजीच्या पत्रान्वये माहिती पाठविली आहे व त्यानंतर अपिलार्थीस विचाराधीन प्रकरणातील माहिती अर्जासंदर्भात दि.०४.११.२०१० रोजीच्या पत्रान्वये माहिती परत पाठविली आहे. अपिलार्थीच्या दि. ०५.०७.२०१० रोजीच्या माहितीअर्जासंदर्भातील प्रथम अपील अर्जावर दि. ३१.०८.२०१० रोजी सुनावणी घेतली आहे. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होत्या. तथापि अपिलार्थीस माहिती मिळाली नाही, असे त्यांचे मत आहे. म्हणून अपिलार्थीस माहिती पाठविण्यात यावी, असा निर्णय घेतला आहे. त्यानुसार दि. ०४.११.२०१० रोजी माहिती पाठविली आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जामध्ये मागितलेली माहिती दिली नाही, दिशाभूल करणारी दिली आहे, असे मोघमपणे नमूद केले आहे. याकरिता या बाबी नेमकेपणाने त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांच्या आत कळवाव्या लागतील. तदनंतर जन माहिती अधिकारी यांना पुढील पंधरा दिवसाच्या आत मूळ अर्जासंदर्भात अपूर्ण माहिती अपिलार्थीस दिली गेली असल्यास उर्वरित मुद्देनिहाय माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती शोयबा यासमिन,'गुलिस्तान', फाजिलपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आप्पासाहेब रंगनाथ पाचपुते, : अपिलार्थी
रा.गुळनिंब, ता. गंगापूर, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता (प्रकल्प अधिकारी),
आपलं पाणी, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३५१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०५.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी

असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह प्रकरण पाठविण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०८.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अप्पासाहेब रंगनाथ पाचपुते,रा. गळनिंब, पो.अगरवाडगाव, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रकल्प अधिकारी), आपलं पाणी, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बाबासाहेब दिवानराव बारसे,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त,<br>सिडको विभाग,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपआयुक्त परिमंडळ,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक पोलीस आयुक्त, सिडको विभाग,औरंगाबाद - श्री. के.के.यळंबकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - पोलीस उपआयुक्त परिमंडळ-II,औरंगाबाद - श्रीमती सुनिता साळुंके-ठाकरे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०८.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,सिडको विभाग,औरंगाबाद यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी पोलीस स्टेशन, मुकुंदवाडी येथे दि. १५.०३.२०१० रोजी दाखल झालेल्या ९५/२०१० या गुन्हयाबाबत तपासाची कागदपत्रे मागितली आहेत. अपिलार्थी या प्रकरणामध्ये तक्रारदार आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांनी दि. ०९.०७.२०१० रोजी सदर गुन्हयाचा तपास चालू असल्यामुळे अपराध्याच्या तपासामध्ये अडथळा येईल, म्हणून अधिनियमातील कलम ८(ज) च्या तरतुदीनुसार माहिती देता येत नाही, असे विहित मुदतीत दि. ०९.०७.२०१० रोजी कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त परिमंडळ,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,सिडको विभाग,औरंगाबाद यांनी दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केले असल्यामुळे व प्रकरणात चौकशी प्रक्रिया सुरु असल्यामुळे कलम ८(ज) नुसार जन माहिती अधिकारी यांनी नाकारण्यात आलेली माहिती योग्य ठरवून दि. ३०.०८.२०१० रोजीच्या निर्णयानुसार अपील निकाली काढले आहे. यामध्ये अपिलार्थी यांचे समाधान झाल्याचेही नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २६.११.२०१० रोजीच्या द्वितीय अपील अर्जानुसार त्यांना कलम ८(ज) प्रमाणे नाकारलेली माहिती योग्य नाही म्हणून अपील केले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती वर नमूद केलेल्या सर्व बाबी विचारात घेता अधिनियमातील कलम ८(१)(ज) व (छ) अन्वये देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबासाहेब दिवानराव बारसे,रा. न्यु एस.टी.कॉलनी,एन-२,सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,सिडको विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त परिमंडळ-II,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अब्दुल हकीम शेख महेबुब,रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अन्नधान्य वितरण अधिकारी,<br>औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अब्दुल हकीम शेख महेबुब | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. डी . बी. गुंजाळे, अ.का. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद- श्री. कल्याण यमाजी बोडखे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.१०.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १३.०८.२०१० रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहे एप्रिल, २००७ ते दि. १३.०८.२०१० पर्यंत या कालावधीची केरोसिन वितरणासंदर्भातील माहिती अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे दि. ०४.०९.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा अर्ज सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यालयाकडे पाठविला व त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती फार मोठया प्रमाणात आहे व याद्वारे अपिलार्थी यांनी रॉकेल हॉकर्स व किरकोळ विक्री परवाने दिल्याबाबतचा तपशील व हे परवाने बंद करण्याबाबतच्या माहितीचा तपशील मागितला आहे. याबाबीची माहिती दि. ०२.११.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पाठविली आहे.

अपिलार्थी यांच्या म्हणण्यानुसार ही माहिती दि. २४.११.२०१० रोजी सायंकाळी मिळाली आहे. तथापि ही माहिती अपूर्ण आहे अशी त्यांनी त्यांची बाजू आयोगासमोर मांडली. आज रोजी अपिलार्थी यांनी रॉकेल हॉकर्सबद्दल जी माहिती मागितली आहे, अशी एकूण ११३ प्रकरणे जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे आहेत. या माहितीच्या प्रती तयार करुन देणे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(९) नुसार अभिप्रेत नाही. त्याप्रमाणे आयोगाने सूचित केल्यानुसार अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती स्वेच्छेने कमी केली. यापैकी फक्त पाच हॉकर्सची संपूर्ण माहिती देण्याची विनंती केली. या पाच हॉकर्सची नावे अपिलार्थीस पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना कळवावी लागतील.तदनंतर पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी या पाच रॉकेल परवानाधारकांसंदर्भातील सन २००५ ते २०१० या कालावधीशी संबंधित संपूर्ण संचिका अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन द्याव्यात व त्यातील आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात याव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल हकीम शेख महेबुब, इसाक किराणाच्या मागे, गल्ली नं.३,मक्सुद कॉलनी, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ज्ञानेश्वर शिवनाथ आंधळे, : अपिलार्थी
रा.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,पैठण, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,पैठण, जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १४-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसील (पुरवठा), तहसील कार्यालय, पैठण, जि.औरंगाबाद - श्री. बी.एन.वाघ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, पैठण, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. जी. डी.सोनवणे, नायब तहसीलदार (महसूल), पैठण, जि.औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये स्लिपच्या आधारे रेशनकार्ड मिळणेबाबत दि. १५.०४.२०१० रोजी त्यांनी केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी दि. १५.०४.२०१० ते १९.०७.२०१० पर्यंत असा नमूद केलेला आहे. अपिलार्थी यांना त्यांचे रेशन कॉर्ड दोन महिन्यापूर्वी व्यक्तिशः देण्यात आले आहे. याबाबतची पोच त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जाद्वारे दि. १५.०४.२०१० ते १९.०७.२०१० या कालावधीत ज्यांनी रेशन कार्डसाठी अर्ज केले व त्यांना रेशन कार्ड वितरित केले याची यादी मागितली आहे. ही माहिती ज्या रजिस्टरमध्ये आहेत त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्या लागतील.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली वर नमूद केलेली माहिती ज्या रजिस्टरमध्ये आहे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रत अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १४-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानेश्वर शिवनाथ आंधळे, बाबर हॉस्पिटलच्या मागे, कापूस केंद्राजवळ,नवीन कावसान, पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसील (पुरवठा), तहसील कार्यालय, पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गजानन बी. पाटील, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३५५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १२.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद,औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१२.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १४-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन बी. पाटील,द्वारा एल.सेक्टर, ८०/१,हडको,एन-९,महारुद्र हनुमान मंदीराजवळ, औरंगाबाद-४३१००३.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिवाजी वामनराव मुंढे, : अपिलार्थी
एन. एस. १, शिवाजीनगर, १२ वी योजना, सिडको,
साई पिठाच्या गिरणी शेजारी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
अति उच्च दाब बांधकाम मंडळ, महापारेषण, अंजली कॉम्प्लेक्स, खडकेश्वर, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, अति उच्च दाब बांधकाम मंडळ, महापारेषण, अंजली कॉम्प्लेक्स, खडकेश्वर, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३५६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शिवाजी वामनराव मुंढे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, अति उच्च दाब बांधकाम मंडळ, महापारेषण, अंजली कॉम्प्लेक्स, खडकेश्वर, औरंगाबाद<br>- श्री. श्रीकांन्त नागनाथराव खिंडरे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, अति उच्च दाब बांधकाम मंडळ, महापारेषण, अंजली कॉम्प्लेक्स, खडकेश्वर, औरंगाबाद<br>- श्री. भास्कर आत्माराम सावळे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०६-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०६-१०-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६-११-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-११-२०१० |

२. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

३) जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०६-०९-२०१० च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ श्री. हरिभाऊ कुंडलीक घुले यांच्या १९६७ ते २००३ पर्यंतच्या कालावधीतील सेवापुस्तीकेची प्रत व इतर वैयक्तीक माहिती तसेच आयकर रिटर्न, मालमत्तेचा तपशील इत्यादी माहितीची मागणी केली आहे. अपिलार्थी यांनी त्रयस्थाची माहिती मागितली असल्यामुळे त्रयस्थाला माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ खाली त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली. त्यावेळी त्यांनी लेखी निवेदन दिले आहे की, अर्जदार यांनी माझ्याबद्दल जी माहिती मागितली आहे ती संपूर्णपणे वैयक्तीक स्वरुपाची आहे, तसेच अर्जदार यांनी माझ्यावर व माझ्या कुटूंबियावर अनेक पोलीस केसेस, फौजदारी केसेस व कोर्ट सिव्हील सुट दाखल केले आहेत. अपिलार्थी हे माझे जवळचे नातेवाईक असून मला त्यांनी मागितलेली माहिती ही केवळ ब्लॅकमेल करण्याकरिता मागितली असून ती माहिती आपण माहिती अधिकार कायद्याखाली देऊ नये असे कळविले आहे. यानुसार जन माहिती अधिकारी तथा अउदा बांधकाम मंडल, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-१०-२०१० च्या पत्रान्वये त्यांनी मागितलेली माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ८ (१) (ड) (छ) व (त्र) अन्वये फेटाळण्यात येत आहे असे कळविले आहे. यावर अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले असता त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-११-२०१० रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे व तिचा कोणत्याही सार्वजनिक कामाशी संबंध नसल्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ८ (१) (ख) (ड) (छ) व (त्र) अन्वये फेटाळले. या सर्व बाबी आयोगापुढील कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

४) अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली सेवापुस्तिकेची प्रत त्यांना देण्यात यावी.

५) वरील सर्व बाबी विचारात घेता राज्य माहिती आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली त्रयस्थ पक्षाची वैयक्तीक माहिती, जसे आयकर विवरण, घोषित मालमत्तेचे विवरण, तसेच रजा कालावधी, इत्यादीचा तपशील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (ड.) (छ) (त्र) अन्वये देय होणार नाही. तथापि शासकीय कामकाज करीत असताना त्यांच्या सेवापुस्तिकेत ज्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत, जसे त्यांच्या नियुक्तीची तारीख, नियुक्तीचे पद, त्यांची वेतनश्रेणी, पदोन्नतीचा तपशील, शिक्षा / पारितोषिक दिले असल्यास

त्याचा तपशील, इत्यादी माहिती देय होत आहे. सेवापुस्तिकेतील वैयक्तीक बाबी जसे कुटूंबाचा तपशील, जमीन, घराचा पत्ता, रजा इत्यादीचा तपशील देय होणार नाही. अतः माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१) नुसार जी माहिती देय होत नाही ती वगळून वर नमूद केल्याप्रमाणे कलम १० नुसार उर्वरीत माहिती अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे शासकीय कामकाज करीत असताना सेवापुस्तिकेत ज्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत, जसे नियुक्तीची तारीख, नियुक्तीचे पद, वेतनश्रेणी, पदोन्नतीचा तपशील, शिक्षा / पारितोषिक दिले असल्यास त्याचा तपशील इत्यादी माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी वामनराव मुंढे, एन. एस. १, शिवाजीनगर, १२ वी योजना, सिडको, साई पिठाच्या गिरणी शेजारी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, अति उच्च दाब बांधकाम मंडळ, महापारेषण, अंजली कॉम्प्लेक्स, खडकेश्वर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, अति उच्च दाब बांधकाम मंडळ, महापारेषण, अंजली कॉम्प्लेक्स, खडकेश्वर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शैलेंद्र मदन मलारा, : अपिलार्थी
९, श्रीराम कॉलनी, साई हॉस्पिटल जवळ, समर्थनगर,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शेंद्रा जहांगिर,
तालुका जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३५७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शैलेंद्र मदन मलारा | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शेंद्रा (क),<br>तालुका जिल्हा औरंगाबाद - श्री. खरबडे अर्जुन गंगाधरराव | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद - श्रीमती रंजना एल. राठोड | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०२-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-११-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-१२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहिती अर्जावर त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, औरंगाबाद यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्यावर त्यांना सर्व माहिती प्राप्त झालेली आहे, तथापि त्यांना ७० दिवस उशिराने माहिती मिळाली आहे, त्यामुळे नियमानुसार जन माहिती अधिका-यास दंड लावण्यात यावा.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांच्या मदतीला त्यांच्याकडे कोणीही नाही, शासकीय कामकाज सांभाळून त्यांच्याकडे येणा-या माहिती अर्जावर माहिती देण्यासाठी ते प्रयत्नशील राहतात आणि ही माहिती देण्यास त्यांना अंशतः विलंब झालेला आहे म्हणून अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांनी विलंबाबाबत केलेला युक्तिवाद माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) खाली पुरेसा आहे असे आयोगाचे मत आहे. आता अपिलार्थीस माहिती मिळाली असल्याने अपील निकाली काढण्याच्या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शैलेंद्र मदन मलारा, ९, श्रीराम कॉलनी, साई हॉस्पिटल जवळ, समर्थनगर,

औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शेंद्रा (क), तालुका जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजकुमार अग्रवाल, : अपिलार्थी
सुविधा डेव्हलपर्सचे सहभागीदार, पीटी कंपाऊंड, मोंढा नाका, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३५८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ नियोजनकार (नवीन शहरे), सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद, औरंगाबाद - श्री. आशुतोष उइके | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रशासक, सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद, औरंगाबाद - श्री. सुधाकर बापूराव तेलंग | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०२-०८-२०१० च्या माहिती अर्जान्वये गट नंबर १८४, तीसगाव नगर, वाळूज मधील ५९ आर जमिनीच्या भूसंपादनाच्या सद्यस्थितीबाबतची एकूण दोन मुद्दयावर माहिती मागितली आहे. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ होते. माहिती उपलब्ध करुन घेऊन अपिलार्थीस दिनांक २९-१०-२०१० रोजी १३ पृष्ठांची व एक नकाशाची माहिती पाठविली आहे. त्यामध्ये ज्या गटाची जमीन संपादित झालेली होती त्याचा तपशील आहे. सदरची माहिती जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक, सिडको कार्यालय, औरंगाबाद यांच्या अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक १३-१०-२०१० रोजी घेतलेल्या निर्णयानुसार दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थीने विचारलेल्या माहितीपैकी त्यांच्या जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव नव्हता. ही बाब अपिलार्थीस कळविण्यात आलेली नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या दिनांक ०२-१२-२०१० च्या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी नमूद केले आहे की त्यांना माहिती देण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी ज्या भूखंडाबाबत माहिती विचारलेली आहे त्या भूखंडाबाबत भूसंपादनचा प्रस्ताव नव्हता हि बाब कळविण्यात यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजकुमार अग्रवाल, सुविधा डेव्हलपर्सचे सहभागीदार, पीटी कंपाऊंड, मोंढा नाका,

औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ नियोजनकार (नवीन शहरे), सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक, सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रतनकुमार नामदेव साळवे,<br>एफ ४/१४, आयोध्यानगर, एन-७, सिडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, जनता एस. पी. एम. एस. अध्यापक विद्यालय,<br>आयप्पा मंदिरासमोर, बीड बायपास रोड, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वैजापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रतनकुमार नामदेव साळवे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, जनता एस. पी. एम. एस. अध्यापक विद्यालय,<br>आयप्पा मंदिरासमोर, बीड बायपास रोड, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वैजापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २४-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-११-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-१०-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-१२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १९-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता या प्रकरणी आयोग सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून आयोग निश्चित करीत असून प्रकरण त्यांच्याकडे प्रथम अपिलावरील सुनावणीसाठी पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १५-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रतनकुमार नामदेव साळवे, एफ ४/१४, आयोध्यानगर, एन-७, सिडको,

औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, जनता एस. पी. एम. एस. अध्यापक विद्यालय, आयप्पा मंदिरासमोर, बीड बायपास रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किसन मुरलीधर भोसले, : अपिलार्थी
रा. जडगांव, पो. करमाड, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३६० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. किसन मुरलीधर भोसले | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (२), तहसील कार्यालय, औरंगाबाद<br>- श्री. डी. एम. देशपांडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी तहसील कार्यालय, औरंगाबाद कडील जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या वडिलोपार्जीत जमिनीच्या १९८२ मध्ये झालेल्या वाटणीपत्राच्या मूळ कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, सदरची कागदपत्रे तलाठ्याकडे असल्याकारणाने तलाठी, सजा मंगरुळ यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे कळविण्यात आले. यावर तलाठी, सजा मंगरुळ यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, १९८२ च्या या नस्तीचा शोध घेऊनही त्यांच्या कार्यालयात ही संचिका उपलब्ध होऊ शकली नाही त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आली नाही.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, पूर्वी असलेल्या सजाचे चार भाग झाले आहेत. प्रश्नाधीन भूखंडांचे रेकार्ड हे भालगाव सजामध्ये आहे. ही संचिका शोधण्यासाठी अपिलार्थी यांची मदत करण्याची तयारी आहे. या पार्श्वभूमीवर तहसीलदार, औरंगाबाद यांना आयोगाचे निदेश आहेत की, त्यांनी भालगाव सजाचे अभिलेखे पाहणीकरिता दोन कर्मचा-यांचा एक गट करुन त्यांना तिकडे सजावर पाठवावे तसेच अपिलार्थी यांनाही या पाहणीच्या वेळी बोलवावे. सदरची प्रक्रिया दोन महिन्यात पूर्ण करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

तहसीलदार, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती मिळेल अशी कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किसन मुरलीधर भोसले, रा. जडगांव, पो. करमाड, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (२), तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. योगेश तुकाराम डेरे, : अपिलार्थी
डी-२६, शिवशंकर कॉलनी, तारामती भवन समोर,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री,
जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. योगेश तुकाराम डेरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत आयोग याची गंभीर नोंद घेत आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा खुलासा आयोगास सादर करावा.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, दिनांक २४-०८-२०१० च्या माहितीच्या अर्जान्वये दिनांक २८-०६-२०१० रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर २४ तासात पंचनामा करु असे तोंडी आश्वासन दिले होते या झालेल्या पंचनाम्याची झेरॉक्स प्रत त्यांनी मागितली आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-१२-२०११**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. योगेश तुकाराम डेरे, डी-२६, शिवशंकर कॉलनी, तारामती भवन समोर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संपत भैय्यासाहेब रोडगे, : अपिलार्थी
मु. पो. रघुनाथनगर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
वि. प्र. गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम)
विभाग, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>वि. प्र. गंगापूर, जिल्हा औरंगाबाद - श्री. टि. ओ. राठोड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम)<br>विभाग, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. व्ही. जी. देशमुख, उप<br>कार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-१२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी गंगापूर विभागाअंतर्गत ३१ मार्च २००८ नंतर सर्व अंतर्गत रस्त्याच्या झालेल्या व चालू असलेल्या कामाची माहिती, त्यांचे अंदाजपत्रक कशा प्रकारे होते, प्रत्येक कामावर झालेला खर्च इत्यादीचा विस्तृत तपशील मागितला आहे. सदरची माहिती संकलीत करुन दिनांक २४-०२-२०११ रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी दिनांक २५-०२-२०११ रोजी याबाबत पोच दिली आहे. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १५-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संपत भैय्यासाहेब रोडगे, मु. पो. रघुनाथनगर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वि. प्र. गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाबुलाल शंकर सोनार, : अपिलार्थी
रा. मु. बेंबळ्याची वाडी, पो. खोडेगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३६३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाबुलाल शंकर सोनार | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद - श्रीमती ज्योत्सना धुळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०७-२०१०<br>फेरसादर दिनांक<br>०६-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १३-०९-२०१० रोजीचा माहितीसाठीचा अर्ज विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे केला आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तहसील कार्यालय, औरंगाबाद येथे उपलब्ध असू शकते, त्यामुळे माहितीचा अर्ज त्यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे करणे योग्य ठरले असते. अपिलार्थी यांच्या स्वतःच्या जमिनीशी संबधित ही माहिती आहे व न्यायालयीन कामकाजासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता असल्याने अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती जेथे उपलब्ध आहे तेथून ती प्राप्त करुन घेऊन एक विशेष बाब म्हणून तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांनी कार्यालय प्रमुख या नात्याने विनामूल्य नोंदणीकृत टपालाने पाठविण्याची व्यवस्था करावी, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांच्या कार्यालयातील संबधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन त्या अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठविण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबुलाल शंकर सोनार, रा. मु. बेंबळ्याची वाडी, पो. खोडेगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रतनकुमार नामदेव साळवे,<br>एफ ४/१४, आयोध्यानगर, एन-७, सिडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रतनकुमार नामदेव साळवे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-१२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत याची आयोग गंभीर दखल घेत आहे.

प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रतनकुमार नामदेव साळवे, एफ ४/१४, आयोध्यानगर, एन-७, सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुण रघुनाथ गायके, | : | अपिलार्थी |
| मु. पो. रेल, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कन्नड, जिल्हा औरंगाबाद | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कन्नड, जिल्हा औरंगाबाद | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अरुण रघुनाथ गायके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | सहायक अभियंता, महावितरण उपविभाग, कन्नड, जिल्हा औरंगाबाद - श्री. ईश्वर महादेव भारती | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | कार्यकारी अभियंता, महावितरण कन्नड, जिल्हा औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. जीवन एस. चव्हाण, उप कार्यकारी अभियंता | | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०९-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १५-०९-२०१० च्या माहिती अर्जान्वये सन २००९ ते २०१० मधील इम्प्रा योजनेबाबतचे शासनाचे आदेश पत्रक व वाटप कशी करण्यात आली याची छायांकीत प्रत अशी माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महावितरण उपविभाग, कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांनी दिनांक ०३-११-२०१० रोजी अपिलार्थीस सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने पाठविली आहे. तथापि सदरचा लिफाफा "माहिती घेण्यास नकार" या नोंदीसह परत आला आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांनी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित न राहिल्याने दिनांक ०६-११-२०१० रोजीच्या पत्रान्वये माहितीची अपिलार्थीस पुन्हा पाठविली आहे. अपिलार्थीस ती माहिती प्राप्त झाली आहे तथापि अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी शासन आदेश पत्रकाची प्रत त्यांना मिळाली नाही.

अपिलार्थी यांनी मागितलेली शासन आदेश पत्रकाची प्रत त्यांना त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्यास ती देणे अभिप्रेत होते नसल्यास तशी प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे अपिलार्थीस कळविणे अपेक्षित होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी हि कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. याकरिता त्यांना अपिलार्थीने मूळ माहिती अर्जान्वये मागितलेल्या शासन आदेश पत्रकाची प्रत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी लागेल.

अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देण्यास जन माहिती अधिकारी यांचेकडून अंशतः विलंब झालेला आहे. भविष्यात त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त होणा-या माहिती अर्जांना विहित मुदतीत प्रतिसाद देण्याकरिता दक्ष रहावे असे आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>**आदेश**</u>

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरित माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रघुनाथ गायके, मु. पो. रेल, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महावितरण उपविभाग, कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. खुशालचंद गोविंदलाल बाहेती, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद शहर,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद शहर,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), औरंगाबाद शहर - श्री. के.एस.बहुरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - पोलीस उपायुक्त (मु.), औरंगाबाद शहर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),औरंगाबाद शहर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १४.०८.२०१०

रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या स्वतःच्या सेवेतील मूळ नेमणूक दिनांक, पदनाम, सेवानिवृत्तीचा दिनांक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक पदावरील पदोन्नतीची तारीख, विशेष शाखेतील सेवाकालावधी इत्यादी एकूण आठ मुद्यांवर माहितीची मागणी केली आहे. या सर्व मुद्यांसंदर्भात अपिलार्थी यांच्या सेवापुस्तिकेवरुन त्यांना दि. ०८.०९.२०१० रोजीच्या पत्राद्वारे माहिती देण्यात आली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी यांचे द्वितीय अपील दि. ०६.१२.२०१० रोजीचे आहे. त्यामध्ये त्यांना चुकीची व अपूर्ण माहिती मिळाल्याचे नमूद करुन पूर्ण व अचूक माहिती मिळावी अशी आयोगास विनंती केली आहे.या बाबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांना नेमकी व अचूक कोणती माहिती अप्राप्त आहे ही बाब पंधरा दिवसांच्या आत कळवावी व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांचा मूळ अर्ज विचारात घेऊन पुढील पंधरा दिवसांच्या आत माहिती पाठवावी लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),औरंगाबाद शहर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खुशालचंद गोविंदलाल बाहेती, ४९/५०, तीरुपती नगर, मधुराज हौसिंग सोसायटी, गारखेडा परिसर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), औरंगाबाद शहर यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मु.), औरंगाबाद शहर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,
हिंद सेवा मंडळाचे शांतीलालजी जवाहरमलजी पाटणी
विद्यालय, श्रीरामपूर, जि.अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी, :
हिंद सेवा मंडळाचे शांतीलालजी जवाहरमलजी पाटणी
विद्यालय, श्रीरामपूर, जि.अहमदनगर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २१.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.०२.२०१० (फेरसादर,दि.०८.१२.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाली नाही व त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प., अहमदनगर हे जन अपिलीय अधिकारी होतात. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २१.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प., अहमदनगर यांच्याकडे प्रकरण अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज, त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपील अर्जाच्या प्रतीसह परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प., अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दि.२१.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी, ई-६२/०५, मयुरनगर, एन-११,टी.व्ही.सेंटरजवळ, हडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,हिंद सेवा मंडळाचे शांतीलालजी जवाहरमलजी पाटणी विद्यालय, श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प., अहमदनगर यांना (अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज, त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपील अर्जाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वॉर्ड अभियंता, वॉर्ड फ,
महानगरपालिका,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता वॉर्ड(ई व फ)
महानगरपालिका,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३६८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०२.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३०.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.१०.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची गंभीर दखल आयोग घेत आहे.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे,तुळजाई,४१,श्रीनगर कॉलनी, संत एकनाथ हॉस्पीटलसमोर, उल्कानगरी,औरंगाबाद - ४३१ ००५

२. जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अभियंता, वॉर्ड फ,महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,वॉर्ड (ई व फ) महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विजय आर.कटारिया, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३६९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विजय आर.कटारीया | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधिव्याख्याता, शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद - श्री. व्ही. आर. कटारीया, औरंगाबाद | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्राचार्य, शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद- डॉ. एस.एस. खडबडी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्याच प्राधिकरणामध्ये कार्यरत असतात. सध्या त्यांच्याकडे जन माहिती अधिकारी या पदाचा कार्यभार आहे व त्यांनी मूळ माहिती अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना मिळालेली आहे. त्यामुळे विचाराधीन द्वितीय अपिलावर सुनावणीची आवश्यकता नसावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.यास अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी सहमती दर्शविली.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजय आर.कटारीया,रो.हा.नं.२, पगारीया रेसीडन्सी, वेदांतनगर, स्टेशनरोड, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अधिव्याख्याता, शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दे. म. अकोलकर,रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>कोषागार कार्यालय,बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>कोषागार कार्यालय,बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१२.२०२० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात सुनावणी होऊन निर्णय पारित झाल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस

सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या प्रकरणी वरिष्ठ कोषागार अधिकारी,बीड यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दि. २१.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ कोषागार अधिकारी,बीड यांनी अपिलार्थीच्या दि.२१.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दे. म. अकोलकर,३३(अ),रेणूका, छत्रपतीनगर,गारखेडा परिसर, औरंगाबाद-४३१ ००५

२. जन माहिती अधिकारी, कोषागार कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ कोषागार अधिकारी,लेखा व कोषागारे, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कैलास विठ्ठलराव अक्कर, : अपिलार्थी
रा.सिल्लोड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था.स्तर),
उपविभाग,सिल्लोड, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कैलास विठ्ठलराव अक्कर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.१०.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, दि. ०५.०८.२०१० रोजी माहितीसाठीचा अर्ज सादर केला होता. या अर्जान्वये सिल्लोड उपविभागांतर्गत केलेल्या कोल्हापूर बंधारा दुरुस्तीच्या कामांची माहिती जसे - निविदा,प्रारुप, अंदाजपत्रके, देयके तयार केल्यास सत्यप्रती, कंत्राटदाराचे नाव मागितली होती. माहितीचा कालावधी दि. ०१.०१.२००८ ते ०४.०८.२०१० असा आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०८.२०१० रोजी त्यांना कळविले की, अशाप्रकारच्या कोल्हापूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीची कामे केलेली नाहीत. अपिलार्थी यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल.पा.कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी झाली व त्यासंदर्भात दिलेल्या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. २५.१०.२०१० च्या आत अपिलार्थीस माहिती देण्यात यावी, असे सूचित केले. या सुनावणीनंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.१०.२०१० रोजी सदरच्या माहितीकरिता रु. ३०००/- चा भरणा करुन माहिती घ्यावी, असे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांनी आयोगास विनंती केली की, त्यांना विनामूल्य माहिती देण्यात यावी.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी कोल्हापूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीची माहिती मागितली होती. अशाप्रकारची कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती झाली नाही, असे दिसून येत आहे. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये पूरसंरक्षक उपाय योजनेची कामे ही दुरुस्तीची कामे झालेली आहेत, त्यासंदर्भात माहिती द्यावी, असा निर्णय दिला आहे. ही बाब कोल्हापूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीशी निगडीत आहे किंवा कसे, तसेच अपिलार्थीचा मूळ अर्ज व तांत्रिक बाबी विचारात घेऊन निर्णय घेणे आवश्यक होते. तथापि आता अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे विनामूल्य माहिती देण्याची व्यवस्था करावी, लागेल या निष्कर्षाप्रत आयोग घेत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १५-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कैलास विठ्ठलराव अक्कर, संपादक सा.सहयाद्रिचा आवाज, पांडव निवास, दत्त मंदिराजवळ,सिल्लोड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. समाधान रामलाल बावस्कर, : अपिलार्थी
रा.आमखेडा, ता.सोयगाव,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय,आमखेडा,ता.सोयगाव,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सोयगाव,
जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत, आमखेडा, ता.सोयगाव,जि.औरंगाबाद - श्री. ए.एन.दौड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सोयगाव, जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. डि.वाय. अंभोरे, विस्तार अधिकारी (पं.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, आमखेडा, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २०.०८.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत कार्यालय,आमखेडा संदर्भात एकूण ८ मुद्यांवर विस्तृत माहिती मागितली आहे. काही मुद्यांच्या माहितीचा कालावधी सन २००५ ते २०१० व इतर मुद्यांच्या माहितीकरिता सन २००७ ते २०१० असा आहे. सर्व माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. दरम्याच्या कालावधीत विहित मुदतीत रक्कम भरुन माहिती घेऊन जावी, असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांच्या द्वितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाली नाही असे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता माहिती तयार आहे, असे दिसून येत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १५-१२-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. समाधान रामलाल बावस्कर,मु.आमखेडा, पो.ता.सोयगाव, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आमखेडा, ता. सोयगाव, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सोयगाव,

जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वासुदेव दयाराम चावडा, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपआयुक्त (सिडको),
महानगरपालिका,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३७३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. वासुदेव दयाराम चावडा | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०९.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की,त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" मोहल्ला अजबनगर येथील गणपती मंदीर न पाडण्याचे आदेश कुठल्या कोर्टाचे आहेत. अनधिकृत धार्मिक स्थळ काढणेबाबत आपले पत्र जा.क्र./मनपा/प्र.अ./१३६१/२०१० चे नुसार आपण म्हणता कोर्टाचे आदेश अतिक्रमण न पाडण्याचे आहेत त्यामुळे कारवाई होणार नाही. तरी मला कुठल्या कोर्टाचे आदेश आहेत व काय आहेत याची माहिती द्यावी. सात दिवसांचे आत द्यावी." त्यांनी मा. उच्च न्यायालयाचे अतिक्रमण न पाडण्याच्या आदेशाची प्रत मागितली आहे. त्यांना जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी त्यांना एका अर्जासंदर्भात दिलेल्या माहितीमध्ये न्यायालयाने धार्मिक स्थळ न पाडण्याचे दिलेले आदेश अद्याप कायम असल्याचे कळविले आहे. त्यामुळे त्यांनी या आदेशाची प्रत मागितली आहे. तथापि त्यांना जी माहिती देण्यात आली त्यामध्ये अनु. क्र. ५ वर सदरचे अतिक्रमण पाडण्याच्या तरतुदींचा उल्लेख असून ते पाडण्याचे आदेश आहेत. त्यामुळे त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळालेली नाही.

या प्रकरणी आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत देण्याची व्यवस्था करावी लागेल व माहिती उपलब्ध नसल्यास तसे कळविण्याची व्यवस्था करावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील, अशी व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वासुदेव दयाराम चावडा,तिरुपती वॉशिंग सेंटर, अजबनगर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दत्ता पाटील काकडे, : अपिलार्थी
रा.टाकळी कोलते, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पुरवठा विभाग, तहसील कार्यालय,फुलंब्री,
जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय,फुलंब्री, जि.औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३७४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दत्ता पाटील काकडे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये सन २०१० मध्ये शासनाने स्वस्तधान्य दुकानाच्या कार्डधारकाची तपासणी हाती घेतली होती. या तपासणीअंती झालेल्या पात्र व अपात्र कार्डधारकांची माहिती त्यांनी मागितली होती. पुढे त्यांनी

असे सांगितले की, या गावात २-३ स्वस्तधान्य दुकाने असतील. त्यांनी जन अपिलीय अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. तसेच स्वस्तधान्य दुकानातील कार्डधारकाची यादी व तपासणी केलेल्या कार्डधारकाचा तपशील इत्यादी बाबतचा तपासणी अहवाल मागितला होता. ही माहिती मिळाली नाही.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेतलेला नाही, असे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, फुलंब्री, जि.औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, फुलंब्री, जि.औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.०३.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्ता पाटील काकडे, दक्षता समिती सदस्य, टाकळी कोलते, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, पुरवठा विभाग,तहसील कार्यालय,फुलंब्री, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, फुलंब्री, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीपाद शंकरराव रुईकर, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १५-१२-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीपाद शंकरराव रुईकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद - श्री. काकासाहेब बा.शिंदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,औरंगाबाद - श्री. एम.ए.सय्यद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६.०८.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या

माहितीच्या संदर्भात त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत दि. १६.०८.२०१० रोजी प्रतिसाद दिलेला असून आवश्यक शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी, असे कळविले आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात देणे अभिप्रेत असल्यामुळे अपिलार्थी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे माहिती तयार करुन मागत आहेत, ती अधिनियमातील 'माहिती' या संज्ञेत येत नसल्याने देता येत नाही, असे युक्तिवादात आयोगासमोर कथन केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये हीच भूमिका घेतली. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, काही माहिती त्यांना प्राप्त झाली आहे. तथापि त्यांना सर्व परिमाणे मिटरमध्ये दाखविणारा, प्रमाणबध्द नकाशा तयार करुन त्याची प्रत आवश्यक आहे. ही विनंती जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी मान्य न केल्यामुळे त्यांना हवी तशी माहिती मिळाली नाही.

आयोगापुढील कागदपत्रे व युक्तिवाद, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मधील 'माहिती' ची व्याख्या इत्यादीचा साकल्याने विचार करता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात देय होईल. संस्करण करुन माहिती अपेक्षिली असल्यास त्यासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या प्रचलीत प्रशासकीय पध्दतीप्रमाणे स्वतंत्रपणे अर्ज करणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीस देय होत असलेली उपलब्ध माहिती दिली गेली आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली आहे. सबब प्रकरण या टप्प्यावर बंद करण्यात यावे, असे आयोगाचे मत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १५-१२-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीपाद शंकरराव रुईकर, १२७,शास्त्रीनगर, घर क्र. ४.१०.५७९, औरंगाबाद-४३१ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.